• पंढरपूर • गुरुवार, २१ नोव्हेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

NO PAIDNEWS NEWSPAPER

pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - १८१




अपक्षाला उमेदवाराला काँग्रेसने दिला पाठिंबा PII



कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंची ऑल इंडिया इंटर... PIII

## » At a Glance

### जिल्हाधिकाऱ्यांनी बजावला मतदानाचा हक्क



**सोलापूर :** आज सकाळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ अंतर्गत सिद्धेश्वर प्रशाला येथील मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यातील सर्व मतदारांनी आज सायंकाळी सहा वाजेपर्यंत आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### गर्दीमुळे मतदान प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू



**बार्शी :** बार्शी विधानसभा 246 सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जामगाव (आ) येथे मतदारांचा मोठा प्रतिसाद दिसून येत आहे. मतदान केंद्रावर सायंकाळी सव्वा सहा वाजल्यानंतरही मोठ्या प्रमाणात गर्दी असल्यामुळे मतदान प्रक्रिया अद्याप सुरू आहे. मतदान केंद्रावर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी निश्चित कालावधी सांगणे सध्या कठीण आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, मतदान वेळ संपल्यानंतरही केंद्राच्या हद्दीत उपस्थित असलेल्या मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावण्याचा अधिकार आहे.

### 31 मेपर्यंत बदली प्रक्रिया पूर्ण होणार

**सोलापूर :** जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांसाठी कायमस्वरूपी वेळापत्रक ठरले आहे. जिल्हा परिषद शिक्षकांची आता ऑनलाईन बदल्या होणार असल्याने बदलीतील वशिलेबाजीला लगाम बसणार आहे. राज्यातील शिक्षकांचे दरवर्षी लांबणारे बदल्यांचे गुऱ्हाळ आता बंद होणार आहे. यापुढे एकाच वेळापत्रकानुसार संपूर्ण राज्यात जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या होणार आहेत. 31 मेपर्यंत बदली प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

## एक्झिट पोल'मधूनही सत्तेसाठी चुरस

# महायुतीच्या बाजूने कौल मिळण्याची शक्यता ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रात अत्यंत चुरशीच्या झालेल्या निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या टक्केवारीवरुन संभ्रमावस्था निर्माण झाली असली तरी महायुतीला अपेक्षित यश मिळेल अशी चर्चा किंवा मतं ज्येष्ठ पत्रकारांकडून व्यक्त केली जात आहेत. महायुतीच्या अपेक्षित यशाचे कारण म्हणजे शेतकऱ्यांच्या धान्य भाव वाढीला केंद्र सरकारने दिलेला शेतकऱ्यांना परवडणारा भाव दिल्याने तसेच केंद्र शासनाच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या शेतकऱ्यांना लाभदायक ठरतील अशा योजनेचे फळ महायुतीला मिळण्याची शक्यता दाट आहे.

संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर भाजपाने जातीय समीकरणाचा उमेदवारीसाठी घातलेला मेळ हा अतिशय लाभदायक ठरणार असल्याचे दिसून येते. विशेषतः विदर्भात लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाला बसलेला धक्का या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात सावरला जाईल आणि महायुतीला अपेक्षित यश मिळू शकेल. अशी शंका तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

या निवडणूकीत विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात ओबीसी मराठा यांच्या मतदानावर महायुतीच्या बाजूने संघर्ष होईल असे वाटत असतानाच भाजपाच्या समीकरणामुळे आणि महाराष्ट्रातील युती सरकारने लोकोपयोगी अनेक योजना कृतीत उतरवल्याने त्याचा फायदा होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. महाराष्ट्रातील



कांही ज्येष्ठ विश्लेषकांच्या मते महायुतीला लोकसभेच्या निवडणुकीत आलेले अपयश निश्चितपणे धुऊन काढले जाईल असे भाष्य वर्तविले जात आहे.

शेवटच्या १० ते ११ दिवसात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट भाजपाचे ज्येष्ठ नेते, आर.पी.आय.चे रामदास आठवले यांच्या सांघिक प्रयत्नाला बुथवाईज कार्यकर्त्यांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याने महायुतीच्या यशाला प्रतिसाद येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विदर्भात मोदी, अमित शहा यांच्या सभेने महायुतीसाठी सकारात्मक परिणाम होताना दिसतो. महाराष्ट्रातील एकूण मतदानाची टक्केवारी ही सरासरी ५८.२२ टक्के असल्याने सत्ता नेमकी कोणाची येणार? याबद्दलच्या तर्क विर्तकाला उधाण आले आहे. काही प्रतिष्ठीत जागेवर अत्यंत चुरशीच्या निवडणूका झाल्याने युतीच्या उमेदवारांना काही ठिकाणी पराभवाला सामोरे जावे लागेल अशीही चर्चा होताना दिसते तर काही ठिकाणी दुरंगी, तिरंगी व चौरंगी लढती झाल्याचेही दिसून आले आहे. त्यामुळे यश कोणाला मिळणार हे सांगता येत नाही.

कोण जिंकणार, कोण हारणार याचे उत्तर मात्र २३ तारखेला दुपारी ५ वाजेपर्यंत मिळणार असल्याचे तज्ञांचे मत आहे. काही तज्ञांच्या मते त्रिशंकु अवस्था निर्माण होण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. यासाठी कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रपती राजवट लागून सतेची समीकरणं जुळविली जातील असेही तज्ञांचे मत आहे.

## दुपारी ३ नंतर मतदान केंद्रावर रांगा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात सकाळी 11 वाजेपर्यंत पंधरा टक्के मतदान झाले होते. यानंतर दुपारी तीन वाजेपर्यंत 40% मतदान झाले होते. दुपारी तीन नंतर मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी नागरिकांनी रांगा लावल्या असल्याचे दिसून आले. यामुळे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात चुरशीचे मतदान झाले असून कोण विजयी होणार याकडे लक्ष लागले आहे. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महायुती भाजपने आमदार समाधान आवताडे, महाविकास आघाडी काँग्रेसकडून भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत व मनसेकडून दिलीप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे गेल्या पंधरा दिवसापासून मतदान संघात जोमाने प्रचार करण्यात आला. सत्ताधारी व विरोधकाकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करण्यात आले. त्यानंतर बैठका, कॉर्नर सभा, जाहीर सभा घेण्यात आल्या. मतदारांच्या होम टू होम जाऊन प्रचार करण्यात आला. आज बुधवारी मतदान घेण्यात आले. यासाठी प्रशासनाने सर्व तयारी केली होती. सकाळी अकरा वाजेपर्यंत संथ गतीने मतदान होत होते. १५ टक्के मतदान झाले होते. यानंतर मतदानाची टक्केवारी वाढू लागली. दुपारी तीन वाजेपर्यंत 40 टक्के मतदान झाले होते. मात्र तीन वाजल्यानंतर मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या असल्याचे दिसून आले. उमेदवाराचे पदाधिकारी व कार्यकर्ते मतदारांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन येण्यासाठी प्रयत्न करत होते. मतदार संघात चौरंगी लढत होत असल्याने चुरशीचे मतदान झाले होते. यामुळे कोण विजयी होणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.



## कदम यांचे अपहरण करण्याचा प्रयत्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मोहोळचे माजी आमदार रमेश कदम यांच्याकडून खंडणी घेणे किंवा त्यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने त्यांचे अपहरण करण्याचा प्रयत्न करणे प्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेची तातडीने दखल घेत मोहोळ पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे. या दोन संशयिताकडून पुढील माहिती पोलिसांकडून घेण्यात येत असल्याचे समजते.

## तीन पक्षाचे कार्यकर्ते एकत्र आल्याने मतदान केंद्रावर बंदोबस्त वाढविला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** एम आय एम, काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते एकाच ठिकाणी आल्याने निर्माण झालेला तणाव नियंत्रणात आणत पोलिसांनी बापूजी नगर इथल्या शाळेच्या मतदान केंद्रावर बंदोबस्त वाढवला.

त्यामुळे याठिकाणी आता शांततेत मतदान सुरू झाले.एमआयएमचे उमेदवार फारुक शाब्दि, काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे आणि माजी आमदार तथा उमेदवार आडम मास्तर हे सर्व नेते आणि कार्यकर्ते एकाच ठिकाणी आल्याने तसेच शास्त्रीनगर परिसरातील बापूजी प्राथमिक शाळेच्या मतदान केंद्रावर मतदानासाठी प्रचंड



मोठी रांग लागल्याने तणाव निर्माण झाला होता.

त्यातच एमआयएमच्या एका कार्यकर्त्याने गोंधळ घातल्याने तणाव अधिकच वाढला. याची माहिती मिळताच स्वतः पोलीस आयुक्त एम राजकुमार हे पोलिसांच्या ताफ्यासह या ठिकाणी दाखल झाले. पोलीस येताच सर्व राजकीय नेते तिथून निघून गेले. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावून त्या ठिकाणी मतदान सुरू करण्यात आले आहे.

# पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात सरासरी ६९ टक्के मतदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघासाठी सरासरी 69 टक्के मतदान झाले आहे. मतदान शांततेत पार पडले. चारही उमेदवारांनी विजयाचा दावा केला आहे. उमेदवाराचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. यामुळे कोण विजयी होणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे .

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघासाठी आज बुधवारी सकाळी सात वाजल्यापासून मतदानास प्रारंभ करण्यात आला. 3 लाख 73 हजार 357 मतदारांसाठी



357 मतदान केंद्रे तयार करण्यात आली होती. या मतदार संघात भाजपने आमदार समाधान आवताडे, महाविकास आघाडी काँग्रेसकडून भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत तर मनसे कडून दिलीप धोत्रे निवडणूक रिंगणात उभे होते. उमेदवारांनी मतदानाचा हक्क बजावला. यानंतर आपण विजयी होणार असल्याचे पत्रकारांशी बोलताना सांगितले. सकाळी थंडी असल्यामुळे मतदार घराबाहेर पडले नाहीत. मात्र 9 नंतर मतदानाचा वेग वाढत गेला. सायंकाळी पाच वाजेपर्यंत 54.18% मतदान झाले होते. दोन लाख 246 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. दुपारी 3 नंतर मतदानासाठी मतदान केंद्रावर रांगा लागल्या. यामुळे सायंकाळी सहा वाजेपर्यंत सरासरी 69% मतदान झाले असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. मतदान वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. संवेदनशील मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर ठेवण्यात आली होती. मतदान केंद्रावर मतदारांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामुळे मतदारातून समाधान व्यक्त करण्यात आले. या मतदार संघात चौरंगी लढत होणार आहे. चुरशीचे मतदान झाले असल्यामुळे कोण विजयी होणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. मतमोजणी 23 नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील शासकीय गोदाम येथे करण्यात येणार आहे. या मतदार संघातील चारही उमेदवाराचे भवितव्य मतदान यंत्रामध्ये बंद झाले आहे. मात्र चारही उमेदवाराने विजयाचा दावा केला आहे. मतमोजणी नंतर कोण विजयी होणार हे समजणार आहे.

## कोगनुरे यांनी बजावला मतदानाचा हक्क

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार महादेव कोगनुरे यांनी आज पत्नीसह आपल्या मतदानाचा हक्क बजावला. मनसेचे उमेदवार कोगनुरे यांनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता. मात्र दक्षिण मधून त्यांना उमेदवारी मिळणार नाही याची खात्री झाल्यानंतर त्यांनी वेगळी वाट शोधत राज ठाकरे यांची भेट घेऊन मनसेत प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना मनसेकडून उमेदवारी जाहीर झाली होती.



## मतदान प्रक्रियेतील कर्मचाऱ्यांना ऑनलाइन भत्ता

**सोलापूर :** मतदान प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पूर्वी मतदान संपताच रोख स्वरूपात भत्ता मिळत होता. या निवडणुकीपासून हा भत्ता ऑनलाइन मिळणार आहे. यासाठी सोमवारी (ता.१८) ट्रायल पेमेंटसाठी एक रुपया पाठविण्यात येणार असून पूर्ण रकमेची प्रतीक्षा करावी लागणार आहे.प्रत्येक मतदार केंद्रावर एक केंद्रप्रमुख व इतर चार कर्मचारी काम करतात. या कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता, आहार भत्ता देण्यात येतो.







## पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील उमेदवारांनी केले मतदान

# सर्वांनीच केला विजयाचा दावा !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवीत असलेल्या चार मातब्बर उमेदवारांनी मतदान केले असून विजयाचा दावा केला आहे. यामुळे कोण विजयी होणार याकडे लक्ष लागले आहे .

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महायुती भाजपने आमदार समाधान अवताडे, महाविकास आघाडी काँग्रेसने भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने अनिल सावंत तर मनसेने दिलीप धोत्रे यांना उमेदवारी दिली आहे. या चारही उमेदवारांनी गेल्या पंधरा दिवसापासून वाड्या-वस्तीवर जाऊन जोमाने प्रचार केला आहे. आज बुधवारी सकाळी ७ वाजता मतदानास सुरुवात झाली.आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढा अनिल सावंत यांनी लवंगी भगीरथ भालके यांनी पंढरपुरात तर दिलीप धोत्रे यांनी पंढरपुरात मतदानाचा हक्क



बजावला.यानंतर पत्रकारांची बोलताना चारही उमेदवारांनी आपणास चांगले वातावरण निर्माण झाले असून विजयी होणार असल्याचे सांगितले.आमदार समाधान अवताडे म्हणाले, गेल्या तीन वर्षात मतदार संघात चांगले काम केले आहे. यामुळे याची दखल मतदार घेऊन निवडणुकीत विजयी करतील याची खात्री आहे. मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून आपण पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील नागरिकांसाठी कामे केली आहेत. कोरोना काळात अनेकांना मदत केली आहे. याची दखल घेऊन यंदाच्या निवडणुकीत मतदार गरिबाच्या मुलास आमदार करतील याची खात्री आहे. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी आहे. यात जनशक्तीचा विजय होणार आहे. भगीरथ भालके म्हणाले, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात कै. भारतनाना भालके यांनी अनेक विकास कामे केली आहेत. तसेच यापुढेही मतदार संघाचा चांगला विकास करण्याची त्यांची इच्छा होती. मात्र त्यांचे अकस्मात निधन झाले. यामुळे नानांचे राहिलेले काम पूर्ण करण्यासाठी मतदार यंदाच्या निवडणुकीत मला साथ देणार याची खात्री आहे. अनिल सावंत म्हणाले, या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. यामुळे या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी यंदाच्या निवडणुकीत खासदार पवार यांनी नवीन चेहऱ्याला म्हणजे मला संधी दिली आहे. यामुळे यंदाच्या निवडणुकीत आपला विजय निश्चित आहे. विजयी झाल्यानंतर मतदार संघाचा विकास हेच माझे ध्येय असणार आहे. या मतदारसंघात चारही उमेदवारांनी विजयाचा दावा केला आहे. यामुळे कोण विजयी होणार हे 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी नंतर कळणार आहे.

पंढरी संचार

**सोलापूर :** हास्यकलाकार दीपक देशपांडे यांनी बजावला मतदानाचा हक्क बजावला आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हास्य कलाकार म्हणून आहे दीपक देशपांडे यांची ओळख आहे. दीपक देशपांडे यांनी त्यांच्या खास सोलापुरी शैलीत मतदारांना मतदान करण्याचं केलं आवाहन केले आहे.

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली माहिती

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे परंपरेनुसार 24 तास दर्शन असते. त्यानुसार दि.04 नोव्हेंबर रोजी श्रीचा पलंग काढून श्री पांडूरंगास लोड व श्री रूक्मिणी मातेस तक्या देवून 24 तास दर्शन सुरू करण्यात आले होते. या 24 तास दर्शन कालावधीत देव 24 तास उभा असल्याने, मुहुर्त पाहून देवाची विधिवत प्रक्षाळपुजा करून श्रींचे पूर्वीप्रमाणे नित्योपचार सुरू करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.दि. 20 नोव्हेंबर रोजीच्या मुहूर्तानुसार श्री विठ्ठलाची व श्री रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा संपन्न झाली. सदर पूजेच्या पूर्वी संपूर्ण मंदिर स्वच्छ धुवून घेण्यात आले. पहाटे नित्यपुजा झाल्यावर देवाच्या मूर्तीस चांदीचे पाऊल लावण्यात आले. त्यावर भाविक लिंबू साखर लावतात. श्रींचा पलंग शेजघरामध्ये ठेवण्यात आला. दुपारी 12.20 ते 12.30 या वेळेत श्री.पांडूरंगास व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते पहिले स्नान घालण्यात आले. तसेच दुपारी 2.20 ते 5.30 पर्यंत श्री. पांडूरंगास रूद्राभिषेक अकरा ब्रम्हवृंदामार्फत करण्यात आला. त्यावेळी देवास तेल लावून अभ्यंगस्नान घालण्यात आले. त्यानंतर मुर्ती स्वच्छ करून दुधाचा अभिषेक करण्यात आला व देवाचा पोषाख, अलंकार व महानैवेद्य दाखवून आरती करण्यात आली असून, यात्रेसाठी बंद केलेले काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इत्यादी राजोपचार सुरू करण्यात आले. तसेच रात्रौ शेजारतीच्या वेळी देवाचा शिणवटा घालवण्यासाठी आयुर्वेदिक (विविध वनस्पती, सुकामेवा, सुंठ, काळे मिरे इ.) काढा देवाला दाखविण्यात आला. तसेच दि.21 नोव्हेंबर पासून भाविकांच्या हस्ते होणा-या तुळशी अर्चनपूजा, पाद्यपुजा व नित्यपुजा देखील सुरू करण्यात येत आहेत.

श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेची प्रक्षाळपुजा अनुक्रमे मंदिर समिती सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर तसेच व्यवस्थापक मनोज श्रोत्री व लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच या प्रक्षाळपुजे निमित्त मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. या पूजेच्या वेळी मंदिरात पौराहित्य करणारे कर्मचारी, विभाग प्रमुख संजय कोकीळ व अतुल बक्षी उपस्थित असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.अमोल बाळासाहेब शेरे, अभिजीत विठ्ठल मोहिते, राहुल ताम्हाणे, राजू शेठ नाईक या दानशूर भाविकांनी भगवा गोंडा 400 किलो, पिवळा गोंडा 400 किलो, शेवंती 1000 किलो, कामिनी 200 किलो, अष्टर 700 किलो, रिबीन 3 किलो, कबूतर 200 किलो, स्प्रे (रंगीत) इत्यादी फुलांचा वापर करून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व नामदेव पायरी येथे आकर्षक फुलाची सजावट केली असून, यासाठी 40 कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली आहे.

## सत्तरीत ढोबळेंनी घेतल्या 35 प्रचारसभा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** भाजपातून स्वग्रही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात परतलेल्या लक्ष्मण ढोबळे यांनी विधानसभा निवडणुकीत तब्बल 13 उमेदवारांसाठी 35 प्रचार सभा घेत महाविकास आघाडी सरकारची भूमिका पटवून देण्यात यशस्वी ठरले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून शरद पवारांबरोबर असलेल्या लक्ष्मण ढोबळे यांनी 2015 च्या दरम्यान तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या त्रासाला कंटाळून राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपचा आसरा घेतला. भाजपमध्ये त्यांना प्रांतिक सदस्यपदावरून संधी देण्यात आली.

Selected

## सोलापुरात मतदान यंत्रावर चिकटवला जरांगेंचा फोटो



**करमाळा :** करमाळा विधानसभा मतदारसंघात मनोज जरांगेचा फोटो मतदान यंत्रावर ठेवून मतदाराने अजित पवार पुरस्कृत उमेदवाराला मतदान न करता शरद पवारांच्या उमेदवाराला मतदान केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या घटनेमुळे निवडणूक आयोगाकडून कायदेशीर कारवाई केली जाईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकारामुळे मतदान प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आयोगाने या प्रकरणाची गंभीरपणे दखल घेतली आहे.

## धैर्यशील मोहिते पाटलांची निवडणूक आयोगाकडे मागणी केली



**माढा :** माढा मतदारसंघातील उंदरगाव, वाकाव परिसरात बुध कॅप्चरिंग करण्याचा प्रयत्न केला आहे. माढा, माण खटावमध्ये सत्ताधारी आमदार पोलिंग एजंटनाही बसू देत नाहीत. माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा गंभीर आरोप केले आहेत. बूथ कॅप्चरिंगच्या प्रकारात गरज पडली तर फेर मतदान घ्यावे अशी खासदार धैर्यशील मोहिते पाटलांची निवडणूक आयोगाकडे मागणी केली आहे.

## त्रास..

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**कुर्डूवाडी :** मराठी मुलांची शाळा न १ या केंद्रावर पाणी सांडल्याने चिखल झाला होता. त्यामुळे मतदानासाठी येणाऱ्या नागरिकांना / मतदारांना त्रास होत असल्याचे दिसत आहे.

## कुर्डुवाडीत अनेक केंद्रावर मशीन सुरु होत नसल्याने मतदार ताटकळले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कुर्डूवाडी :** कुर्डूवाडी शहरातील विविध मतदान केंद्रावर मतदान मशीन लवकर सुरु न झाल्याने आर्धा तास ते एक तास मतदान उशिरा सुरु झाले.महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज या ठिकाणी मतदान केंद्र क्रमांक ३०४ या ठिकाणी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास व्ही.व्ही.पॅट बंद पडल्याने आर्धा तास मतदान थांवण्यात आले होते. राजेश गायकवाड या मतदारा सह अनेकांना त्यामुळे मतदाना साठी बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली. या केंद्रावर पूर्वी ३० मतदान झाले होते.मराठी मुलांची शाळा या ठिकाणी मतदान केंद्र ३०८, ३१० व ३१२ या ठिकाणी मतदान मशीन वेळत चालू न झाल्याने मतदान काही वेळ उशिराने सुरु झाले.आंतर भारती प्रशाला या ठिकाणी मतदान केंद्र २९१ व २९३ या ठिकाणी हि मशीन सुरु होत नसल्याने मतदान उशिरा सुरु झाले.मध्य रेल्वे प्रशाला या ठिकाणीमतदान केंद्र ३०१ या ठिकाणी मशीन सुरु होत नासल्याने काही काळ उशिरा मतदान सुरु झाले.के.एन भिसे कॉलेज या ठिकाणी वृद्ध व्यक्ती साठी ठेवण्यात आलेल्या व्हील चेअर चे चाक तुटलेले असल्याने काही काळ समस्या निर्माण झाली होती.मराठी मुलींची शाळा न १ या ठिकाणी पाणी सांडल्याने सर्वत्र चिखल झाला होता .त्यामुळे नागरिकांना मतदान केंद्रावर जाण्यासाठी परिश्रम करावे लागत होते.या विषयी निवडणूक अधिकारी शिल्पा ठोकडे यांना विचारणा केली असता सुरवातीला काही ठिकाणी समस्या होत्या.मात्र काही वेळात मतदान सुरुळीत सुरु झाले असे सांगितले.

## आडम मास्तर यांनी बजावला मतदानाचा हक्क



**सोलापूर :** सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील माकपचे उमेदवार नरसय्या आडम मास्तर यांनी आज आपल्या कुटुंबासह बापूजी नगर येथील ज्ञानसागर प्रशाला या ठिकाणी मतदान केले. आडम मास्तर यांच्यापुढे महायुतीचे उमेदवार देवेंद्र कोठे, एम आय एमचे उमेदवार फारूक शाब्दी व महाविकास आघाडीचे उमेदवार चेतन नरोटे यांचे आव्हान असणार आहे.




## मनपा आयुक्तांनी बजावला मतदानाचा हक्क



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूरच्या महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी आज 249 सोलापूर शहर विधानसभा मतदारसंघ येथील केंद्र क्र. 136 मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. तसेच शहर व जिल्हातील सर्व मतदारांनी आज सायंकाळी सहा वाजेपर्यंत आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## मोहिते पाटील बजवला मतदानाचा हक्क



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अकलूज :** खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी अकलूज येथे बजावला मतदानाचा हक्क आहे. लोकांच्या आशा आकांक्षांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मायबाप जनता मला पुनश्च एकदा देईल या आत्मविश्वासासह जनसेवेच्या व्रताची पूर्तता करण्यासाठी मतदान केंद्रावर सहपरिवार माझे मतदान आज केले.

पाहिजे

हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी
शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास
पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल
लिंक रोड,पंढरपूर
फोन नंबर :- ८२९१३१५०८९




## सोलापूरच्या राजकारणात भूकंप

# अपक्षाला उमेदवाराला काँग्रेसने दिला पाठिंबा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला. मात्र, दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उमेदवार अडचणीत आले आहेत. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदेनी माध्यमांना जाहीरपणे माहिती देताना सांगितले की, दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता.

शिवसेनेने गडबड केली आणि दक्षिण सोलापूर मतदारसंघ स्वत:कडे ठेवला. दक्षिण सोलापूर मतदारसंघात काँग्रेसकडून अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा देण्यात आला असल्याची माहिती काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदेनी स्पष्टपणे सांगितले आहे. उद्धव ठाकरेंचे उमेदवार अमर पाटील हे मतदानाच्या दिवशीच अडचणीत आले आहेत.

दक्षिण सोलापूर मतदार संघातून माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे दोन वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. दक्षिण सोलापूर मतदारसंघ काँग्रेसने महाविकास आघाडीच्या बैठकीत मागितला होता. परंतु शिवसेनेने गडबड केली आणि हा मतदार संघ स्वत:कडे ठेवला. अमर पाटील हे शिवसेनेकडून (उबाठा) निवडणूक लढवत आहेत.

अमर पाटील यांचे वडील रातीकांत पाटील हे शिवसेनेचे आमदार म्हणून दक्षिण सोलापूर मतदार संघातून आमदार म्हणून निवडून आले होते. सुशीलकुमार शिंदे यांनी पुढे बोलताना सांगितले की,आम्ही महाविकास आघाडीच्या बैठकीत हे सगळं निदर्शनास आणून दिलं आहे. त्यामुळे आम्ही अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा देत असल्याचे जाहीरपणे सांगितलं आहे.

२० नोव्हेंबर रोजी सकाळी नेहरू नगर येथील मतदान केंद्रावर सुशीलकुमार शिंदे आणि खा.प्रणिती शिंदेंबरोबर अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी उपस्थित होते. अपक्ष उमेदवाराला पांठिबा दिल्याने शिवसेना उबाठा गटाला जबर धक्का बसला आहे.

उद्धव ठाकरे यांची दक्षिण सोलापुरात सभा झाली होती. अमर पाटील यांच्या प्रचाराला उद्धव ठाकरे सोलापुरात आले होते. भाषण करताना उद्धव ठाकरेंनी खा.प्रणिती शिंदे यांचे कान टोचले होते. प्रणिती शिंदेंना आवाहन केले होते.

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुभाष देशमुख यांनी आज आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी मतदान केंद्रावर त्यांनी पत्नी स्मिता देशमुख तसेच मुलगा रोहन देशमुख यांच्या समवेत रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला.

## जिल्ह्यात सायंकाळी 5 वाजेपर्यंत सरासरी 57.09 टक्के मतदान

# जिल्ह्यात एकूण 21 लाख 97 हजार 236 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 20 नोव्हेंबर 2024 रोजी सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात आज मतदान घेण्यात आले. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात सायंकाळी पाच वाजेपर्यंत सरासरी एकूण 57.09 टक्के मतदान झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यात एकूण 38 लाख 48 हजार 869 मतदार असून आज सकाळी सात ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत 21 लाख 97 हजार 236 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला आहे. यामध्ये पुरुष मतदार अकरा लाख तीस हजार 906, स्त्री मतदार दहा लाख 66 हजार 231 तृतीयपंथी 69 मतदाराने मतदान केलेले आहे. मतदानाची एकूण सरासरी 57.09% झालेली आहे.



विधानसभा निहाय झालेले एकूण मतदान व मतदानाची टक्केवारी खालील प्रमाणे.....

244 करमाळा विधानसभा मतदारसंघात एकूण एक लाख 94 हजार 10 मतदारांनी मतदान केले (58.57%).

245 माढा विधानसभा मतदारसंघात एकूण दोन लाख चार हजार 541 मतदारांनी मतदान केले, 57.99%.

246 बार्शी विधानसभा मतदारसंघात दोन लाख दहा हजार 860 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला मतदानाची टक्केवारी 62.48%.

247 मोहोळ अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघात एक लाख 98 हजार 338 मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी 59.84% आहे.

248 सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात एकूण एक लाख 68 हजार 29 मतदारांनी मतदान केले असून 51. 49 टक्के मतदान झालेले आहे.

249 सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात एकूण 11937 मतदारांनी मतदान केले असून मतदानाची सरासरी 49.60% आहे.

250 अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात एकूण 20262 मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी 58.48% आहे.

251 सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात एकूण एक लाख 98 हजार 790 मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी 51.94 टक्के आहे.

252 पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण 2 लाख 2 हजार 446 मतदारांनी मतदान केलेले आहे. मतदानाची टक्केवारी 54.18.

253 सांगोला विधानसभा मतदारसंघात एकूण 2,14,423 मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी 64.30% आहे.

254 माळशिरस अनुसूचित जाती मतदार संघात एकूण दोन लाख नऊ हजार चारशे मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्या असून मतदानाची सरासरी टक्केवारी 59.90% आहे.

## गुलाबी जॅकेट नंतर आता गुलाबी मतदान केंद्र



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्याच्या राजकारणात गेल्या वर्षभरापासून गुलाबी रंगाची गुलाबी, झेंड्याची, गुलाबी जॅकेटची चांगली चर्चा रंगली. यानंतर आता महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी निवडणूक आयोगाने मंगळवेढ्यात गुलाबी मतदान केंद्र उभं केले आहे. या मतदान केंद्रावरील असणारे स्वागत फलक, सेल्फी पॉईंट सारे काही गुलाबी रंगात न्हाऊन निघाले. याच गुलाबी मतदान केंद्राची चर्चा आज दिवसभर रंगली.

Selected

## ३१ डिसेंबर रोजी गोवा मुंबई विमान सेवा सुरु होणार



**सोलापूर :** गोवा येथे मुख्यालय असणाऱ्या फ्लाय ९१ या कंपनीने सोलापूरला सेवा देण्याची अधिकृत घोषणा केली असून लवकर तिकिट विक्री खुली होणार आहे. सोलापूर बरोबरच गोव्यातून जळगाव, सिंधुदुर्ग, पुणे, मुंबई या मार्गावर सेवा विस्तार करण्यात येणार आहे. २३ डिसेंबरला पहिले विमान उडणार आहे. मुंबई, सोलापूर या दोन नवीन थेट मार्गांसह आपला विस्तार ९ गंतव्यस्थानांपर्यंत वाढविला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील पाच ठिकाणांचा समावेश आहे. जळगाव, सिंधुदुर्ग, पुणे, मुंबई आणि सोलापूर येथे ही एअरलाईन जोडली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत, फ्लाय ९१ सोलापूर आणि सोलापूरच्या आसपासच्या जिल्ह्यांमध्ये हवाई सेवा पुरवणारी ही पहिली एअरलाईन बनली आहे. या सेवेमुळे सोलापूरच्या व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळणार आहे. फ्लाय ९१ ने दोन नवीन थेट मार्गांची घोषणा केली आहे आहे.

यामध्ये गोवा-सोलापूर आणि मुंबई-सोलापूर या सेवा आहेत. मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळ, गोवा येथे स्थित असलेली फ्लाय ९१ ही कंपनी सध्या महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, जळगाव, सिंधुदुर्ग तसेच लक्षद्वीपमधील अगत्ती आणि बंगळुरू व हैदराबादसारख्या शहरात सेवा देत आहे.

गोव्यात मुख्यालय असलेली ही एअरलाईन मार्च २०२४ पासून या मार्गावरील सेवेची तारी सुरू केली होती. फ्लाय९१ ची उड्डाणे २३ डिसेंबरपासून या दोन मार्गांवर सुरू होणार आहेत. लवकरच या मार्गांसाठी तिकिटे उपलब्ध होतील. या उड्डाणांच्या सुरवातीमुळे या ठिकाणादरम्यान जलद, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाची सोय करण्याची हमी दिली आहे.

या दोन नवीन थेट मार्गांच्या घोषणेमुळे प्रादेशिक कनेक्टिव्हिटी सुधारण्याचे एअरलाईनचे उद्दिष्ट आहे. केंद्राच्या उड्डाण योजनेशी हे सुसंगत आहे असून दुर्लक्षित आणि दुर्गम भागांत हवाई प्रवासाची उपलब्धता करून देणे हा मुख्या उद्देश आहे.या सेवेमुळे सोलापूरमधील पंढरपूर व अक्कलकोट ही धार्मिक पर्यटन केंद्र गोव्याशी जोडली जाणार आहेत. तर सोलापूरच्या रहिवाशांसाठी गोव्याला सहज सागरी पर्यटनासाठी सहज पोहोचता येणार असल्याचे फ्लाय९१ चे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ मनोज चाको यांनी सांगितले.

## शासकीय कर्तव्य बजावण्यास हायगय केल्याने गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** सांगोला विधानसभा निवडणूक 2024 निवडणूक कामाकरिता प्रथम मतदान अधिकारी (राखीव) वैभव भास्कर कदम सहशिक्षक सुलाखे हायस्कूल बार्शी यांना खवासपुर या ठिकाणी नेमण्यात आले होते.



क्षेत्रीय अधिकारी एस.एम. म्हेत्रे यांनी वारंवार फोन केला परंतु फोन बंद असल्याचे त्यांनी लेखी अर्ज माननीय निवडणूक निर्णय अधिकारी भैराप्पा माळी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांना दिला त्यानंतर त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांना निवासी नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे यांना कायदेशीर कारवाई करणे करिता आदेशित केल्याने विधानसभा निवडणूक 2024 चे शासकीय कर्तव्य बजावण्यास हयगय केली.

म्हणून भारतीय न्याय व संहिता 2023 कलम 223 प्रमाणे सह लोकप्रतिनिधित्व कायदा 1951 चे कलम 134 प्रमाणे श्री साळुंखे यांनी दिनांक 19/11/2024 रोजी सांगोला पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

## मतदान...

पंढरी संचार छायाचित्र सेवा





**पंढरपूर :** खर्डी ता पंढरपूर येथे मतदान करताना शैलेंद्र उर्फ प्रशांत परिचारक.

## सांगोल्यात मतदानासाठी रांगाच रांगा



**सांगोला :** सांगोला मतदार संघात मतदारांनी आता रांगा लावले आहेत. सांगोला मतदार संघातील स्थलांतरित असणारे गुजरात, राजस्थान, पश्चिम बंगाल , अरुणाचल प्रदेश आणि पाकिस्तानच्या अठारी बॉर्डरवरून नागरिक मतदानाला आले आहेत. नागपंथी डवरी समाजाचे असणारे मतदार हे फिरस्ती वर असतात. असे मतदार आता मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सांगोल्यात दाखल झाले आहे.













## लाडक्या बहिणींनी केली मतदान केंद्रावर गर्दी

१. पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील के.बी.पी.कॉलेजवर महिलांनी केलेली गर्दी दिसत आहे.

२. पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील कवठेकर प्रशाला येथे मतदानासाठी महिलांनी केलेली गर्दी.

३. पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघातील कोर्टी ता.पंढरपूर येथील मतदान केंद्रावर महिलांची झालेली गर्दी.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून वेब कास्टिंगची पाहणी



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघातील 3738 मतदान केंद्रावर आज मतदानाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. यातील 2305 मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येत आहे. आज सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नियोजन भवन येथील सभागृहात मतदान केंद्रावर होत असलेल्या वेब कास्टिंगची पाहणी केली. तसेच मतदान केंद्रावर होत असलेल्या मतदान प्रक्रियेची माहिती घेतली.



मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांनी अनगर (ता. मोहोळ) येथे रांगेत उभारून नंतर मतदान कक्षात जाऊन मतदानाचा हक्क बजावला.



मौजे मुंढेवाडी (ता.मोहोळ) येथे महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार श्री. यशवंत(तात्या)माने यांनी पत्नी सौ. नीता आणि कन्या निकिता यांच्यासह मतदानाचा हक्क बजावला.

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या खेळाडूंची

# ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन १० मीटर एअर रायफल व एअर पिस्टल शुटिंग मुले व मुली स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाने वर्चस्व निर्माण केले. ही स्पर्धा व्ही. जी. शिवदारे महाविद्यालय सोलापूर येथे नुकतीच संपन्न झाली.

या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण बारा महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. १० मीटर एअर पिस्टल शुटिंग मुली यामध्ये कु. ऋतुजा धुमाळ एम. कॉम. भाग १ या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर १० मीटर एअर रायफल शुटींग मुले यामध्ये सार्थक बारले बी. ए. भाग २ या विद्यार्थ्यांने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या खेळाडूंची चंदीगड, पंजाब येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समितीमधील सर्व सदस्य, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा.





राजेश कवडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. अमर कांबळे व स्वायत्त महाविद्यालय समन्वयक डॉ. मधुकर जडल यांनी विशेष अभिनंदन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व प्रा. अनिल परमार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन क्षेत्रात सिनिअर विभागातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी विशेष कौतुक केले.

पंढरी संचार

## कुठे मतदान यंत्राची फोडाफोड, तर कुठे पैशांचे वाटप

# राज्यात लोकशाहीच्या उत्सवाला 'दे धक्का'!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी काल (बुधवार) एका टप्प्यात मतदान झाले. सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. तर आता मतमोजणी निकाल २३ तारखेला जाहीर होणार आहेत. मतदानादरम्यान राज्यात अनेक ठिकाणी राडा पहायला मिळाला. कोल्हापुरातील कसबा बावडा परिसरात एकनाथ शिंदे गट आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटातील कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. उत्तरचे उमेदवार राजेश क्षीरसागर कसबा बावडा परिसरात गेले असता कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातील कार्यकर्त्यास गद्दार हा शब्द वापरल्याने तणाव निर्माण झाला, त्यानंतर जोरदार राडा झाला. सतेज पाटील यांनी जमलेल्या जमावाला पांगवले.





राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते नीतेश कराळे यांना वर्धा मतदारसंघातील उमरी मेघे येथे मारहाण करण्यात आली आहे. त्यांनी ही मारहाण भाजप कार्यकर्त्यांनी केल्याचा आरोप केला आहे. यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. मुंबईमध्ये दोन्ही शिवसेनेचे कार्यकर्ते भिडले. त्यात उमेदवारानेही उडी घेतली. मालाड पूर्व पठाण वाडीत शिवसेना आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. शिवसेनेचे उमेदवार संजय निरुपम यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मुस्लिम कार्यकर्त्यांवर मारहाणीचा आरोप केला आहे. निरुपम यांनी खुर्ची आणि टेबल फेकल्याचे समोर आले.

> छोटी बाजारपेठ असलेल्या घाटनांदूरमध्ये सध्या तणावपूर्ण परिस्थिती आहे. थांबवण्यात आलेले मतदान उशिरा सुरू करण्यात आले. गावात तणाव कायम आहे. या प्रकरणी कारवाई करण्याची गरज आहे. दहशत, दादागिरी आणि गुंडशाही असे म्हणत परळीची बदनामी करणारे, प्रत्यक्षात मात्र स्वतःच शेकडोंचा जमाव, हातात लाठ्या-काठ्या घेऊन दगडफेक करत फिरत आहेत, हल्ले करत आहेत, याची निवडणूक आयोगाने तात्काळ दखल घ्यावी व कारवाई करावी,
> **-धनंजय मुंडे,** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री

परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या नेत्याला मारहाण झाल्याचा प्रकार घडला. त्यानंतर त्यांच्या गावात या घटनेचे पडसाद उमटले. घाटनांदूरमधील मतदान केंद्रात घुसून तोडफोड करण्यात आली. या घटनेने परिसरात तणावाची परिस्थिती आहे. गावात मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. परळीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माधव जाधव यांना मारहाण झाली. बँक कॉलनी परिसरात असलेल्या मतदान केंद्रावर जाधव यांना मारहाण करण्यात आली. त्यांच्या मारहाणीचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर व्हायरल झाला. जाधव यांच्या घाटनांदूर गावात या घटनेचे पडसाद उमटले. त्यामुळे गावात तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

बीड जिल्ह्यामध्ये सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडत आहे. परळी विधानसभा मतदारसंघ वगळता पाचही मतदार संघामध्ये सुरळीतपणे मतदान प्रक्रिया दुपारपर्यंत पार पडली; मात्र याला अपवाद ठरले आष्टी विधानसभा मतदारसंघातील पाटोदा तालुक्यातील बेदरवाडी गाव. भाजपचे उमेदवार सुरेश धस यांचे समर्थक आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मेहबूब शेख यांच्या समर्थकांमध्ये काही कारणावरून बाचाबाची झाली.

### अजित पवार गटाच्या आमदाराकडून दमदाटी

● इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे उमेदवार दत्ता भरणे यांनी मतदारांना कथित दमदाटी केल्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. शरद पवार गटाने हा व्हिडिओ ट्विट केला आहे.

## » Selected

### गोवारी समाजाचा मतदानावर बहिष्कार

**गडचिरोली :** गोवारी समाजबांधवांच्या समस्या सोडविण्यात शासन- प्रशासनाची उदासीनता असल्याने साकोली मतदारसंघातील बहुंताश गावात मतदानावर बहिष्कार घातला आहे. साकोली मतदारसंघात बहुसंख्य गोवारी समाज बांधव आहेत. समाजाच्या संघटनांनी मतदान करण्यावर बहिष्कार टाकल्यामुळे केसलवाडा वाघ, एकोडीसह बहुसंख्य गोवारी समाज बांधवांनी मतदान करण्यापासून आपल्याला वेगळे ठेवलेले आहे. आतापर्यंत या समाजातील एकही मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचले नाहीत.

### अपक्ष उमेदवाराचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**बीड :** विधानसभा मतदारसंघात अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. बीड विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचा मतदान केंद्रावरच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. बीड शहरातील छत्रपती शाहू विद्यालयात असणाऱ्या मतदान केंद्रावर हा प्रकार समोर आला आहे. त्यांना अचानक चक्कर आल्याने ते खाली पडले. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे बीड शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### वाशीमध्ये आगीत एक जखमी

**नवी मुंबई :** नवी मुंबईच्या वाशीमध्ये एका इमारतीच्या तळमजल्यावरील फ्लॅटमध्ये आग लागली. आगीवर अग्निशमन विभागाने नियंत्रण मिळविले असून येथील रहिवाशांना बाहेर काढले आहे; मात्र या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला आहे. नवी मुंबईच्या वाशी येथील जेएन ३ टाईप या इमारतीच्या तळमजल्यावरील एका फ्लॅटला सकाळच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. आग लागल्याने इमारतीत राहणाऱ्या नागरिकांमध्ये धावपळ सुरू झाली होती. यानंतर रहिवाशांनी अग्निशमन विभागाला आगीची माहिती दिली. यानंतर अग्निशमन विभागाचे पथक लागलीच घटनास्थळी दाखल झाले होते.

### मुंबईत दोन शिवसेना भिडल्या

**मुंबई :** एकीकडे सुरळीत मतदान सुरु असतानाच काही ठिकाणी गालबोट लागले. महाराष्ट्रात तीन ठिकाणी शिवसेना शिंदे आणि शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते भिडले आहेत. भिवंडी,कोल्हापूर आणि ठाण्यात दोन्ही शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा झाला. मालाडमध्ये संजय निरुपम यांनी आक्रमक पवित्रा घेत खुर्ची आणि टेबल फेकले, तर कोल्हापूरमध्ये सतेज पाटलांनी दोन्ही शिवसेनाचा वाद सोडवला. कल्याण पश्चिम विधानसभेत मतदानाच्या दिवशी राजकीय वातावरण तापले. कल्याण पश्चिम विधानसभेतील आधारवाडी परिसरात पोलिंग बूथ लावण्यावरून शिंदे -ठाकरे गटात वाद झाला.

# राज ठाकरेंच्या बनावट पत्राप्रकरणी गुन्हा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात विधानसभेच्या निवडणुकीसाठीचे मतदान काल (बुधवारी) पार पडले. यावेळी राज्यात अनेक ठिकाणी मारहाण, बोगस मतदान, शिवीगाळ यांसारख्या अनेक घटना घडल्या. मात्र वरळी मतदारसंघात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नावाचे बनावटपत्र वायरल झाले असून त्यात राज ठाकरे यांनी वरळी मतदारसंघात धनुष्यबाणाला समर्थन दिल्याचे नमुद करण्यात आले होते. गंभीर बाब म्हणजे या पत्रावर राज ठाकरे यांची स्वाक्षरी होती. या प्रकरणी आता मनसे कार्यकर्त्यांच्या तक्रारीवरून आग्रीपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



### काय आहे नेमके प्रकरण?

● वरळी विधानसभा मतदारसंघात राज ठाकरे यांच्या नावाने एक बनावट पत्र वायरल झाले. या पत्रावर राज ठाकरे यांची बनावट स्वाक्षरी असून त्यांनी वरळीत शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार मिलिंद देवरा यांना पाठिंबा दिला असल्याचा दावा या पत्राद्वारे करण्यात आला होता.

### पत्रात काय म्हटले ?

● आपण विधानसभा निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात आलो आहोत. शिवडी मतदारसंघात महायुतीने मनसे विरोधात उमेदवार न देऊन मनसेचा सन्मान केला आहे आणि त्याचे दायित्त्व म्हणून हिंदू मतांचे विभाजन टाळण्यासाठी मी वरळीत धनुष्यबाणाला पाठींबा देऊन शिवसेनेला (शिंदे) समर्थन देणार आहे.

# नेरुळमधील केंद्राबाहेर सापडले लॅपटॉप-राऊटर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** विधानसभेचे मतदान सुरु असतानाच नवी मुंबईतील नेरुळमध्ये शिवाजीनगर केंद्राबाहेर एका गाडीत काही संशयास्पद हालचाली दिसल्या. या गाडीची पोलिसांनी तपासणी केल्यानंतर राऊटर, लॅपटॉपसह इतर साहित्य सापडले.

त्यानंतर मतदान मशीन हॅक करणारी यंत्रणा असावी या संशयावरून तुर्भे पोलिसांनी गाडीसह एकाला ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलिसांनी चौकशी केली असता मोबाईलमधील चीप टेस्ट करण्यासाठी लागणारी ही सामग्री आहे, असे संबंधित कर्मचाऱ्याने सांगितले. पोलीस अधिकाऱ्यांनीही नंतर असा खुलासा केला की, पोलिसांनी गाडीतून जप्त केलेल्या सर्व वस्तू या मार्कोस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या आहेत. याचा वापर करून मोबाईलमधील चीप टेस्ट करण्याचे काम केले जाते.

# हुडहुडी भरणार! राज्यात थंडीचा जोर वाढणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील काही भागात हळूहळू थंडीचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. काही भागात लोक शेकोट्या पेटवत आहेत. यावेळी राज्यात पावसाळ्याचं हंगाम लांबला होता. त्यामुळं थंडीचा हंगामा काहीसा उशीरा सुरु झाल्याचं चित्र दिसत आहे. काही भागात हळूहळू थंडी वाढत आहे. अनेक भागात तापमानाचा पारा 20 अंशाच्या खाली आला आहे. त्यामुळं थंडीचा जोर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यातील पश्चिम महाराष्ट्र भागामध्ये सातारा, पुणे आणि कोल्हापुरातील घाटमाथ्यावरील परिसरामध्ये पुढील २४ तासांमध्ये धुक्याचं प्रमाण वाढणार असून, थंडीचा कडाकाही वाढणार आहे. तिथं नाशिक, निफाड क्षेत्रामध्येही तापमानात रातोरात घट झाल्यामुळं थंडीचा कडाका चांगलाच वाढल्याचं पाहायला मिळत आहे. येत्या काळात राज्यात गारठा आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान विभागानं दिला असून, ही थंडी टप्प्याटप्प्यानं संपूर्ण राज्य व्यापताना दिसेल.

## मतदार अडकले वाहतूक कोंडीत

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**पुणेः** खेड-शिवापूर टोल नाक्यावरून पुण्याकडे जाण्यासाठी आणि पुण्यातून कोल्हापूर,भोर, सातारा, सांगलीकडे जाणारे मतदार वाहतूक कोंडीत अडकले. (सविस्तर वृत्त पान ९ वर)

# १४ गावातील नागरिक करतात 'दुहेरी' मतदान


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात महाराष्ट्र आणि तेलंगनाच्या सीमेवर वसलेल्या १४ गावातील नागरिक आज महाराष्ट्र विधानसभेसाठी मतदान केले आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी एकूण ४,१३६ उमेदवार मैदानात असून मतदान प्रक्रिया सुलभरितिने पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने १ लाख मतदान केंद्र उभारले आहेत.

परंतु राज्यात असेही काही मतदार आहेत जे महाराष्ट्रच नव्हे तर शेजारच्या तेलंगन राज्याचेही पात्र मतदार आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात महाराष्ट्र आणि तेलंगण सीमेवर वसलेल्या १४ गावातील ५ हजार २९३ मतदार दोन्ही राज्यात मतदान करण्याचं विशेषाधिकार प्राप्त आहे. या गावातील नागरिक १९८९ सालापासून दोन्ही राज्यात मतदान करत आहेत. ही गावे दोन राज्याच्या सीमेवर असल्याने दोन्ही राज्यानी या गावांवर दावा केला आहे. येथील नागरिकांकडे दोन्ही राज्याचे मतदानाचे ओळखपत्र आहे. शिवाय या गावातील नागरिक दोन्ही राज्याच्या सर्व सरकारी सेवासुविधा घेत असल्याचे दिसून आले आहे.

### दुहेरी' मतदान टाळण्यासाठीचे उपाय ठरले निष्फळ

● दरम्यान, महाराष्ट्र-तेलंगन राज्यांच्या सीमांवर वसलेल्या या १४ गावातील नागरिक कोणत्यातरी एकाच राज्याचे नागरिकत्व असावे यासाठी चंद्रपूर आणि तेलंगणातील आसिफाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांनी एकत्रित आंतरराज्य बैठक घेऊन उपाय काढण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाचा मात्र पूर्णत: फज्जा उडाल्याचे बघायला मिळाले आहे. या गावातील मतदारांनी लोकसभेतही दोन्ही राज्यातील लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांसाठी मतदान केले होते.



# केलेल्या विकासकामांमुळे पुन्हा विजयी होणारच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** शिरूर विधानसभा मतदारसंघात गेली ३५ वर्षे मी प्रत्येक गावामध्ये कोट्यावधी रुपयाची विकास कामे मार्गी लावली आहेत. विकास कामांच्या जोरावर मी सहज निवडून येईल, असे भाष्य महायुतीचे उमेदवार आणि सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आपल्या निरगुडसर येथे केले. मतदानप्रसंगर ते बोलत होते.

दिलीप वळसे पाटील म्हणाले निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदारांचा चांगला पाठिंबा असून मतदान पार पडल्यानंतर किती मताधिक्य मिळेल याबाबत बोलता येईल. या मतदारसंघातील मतदारांनी मला सात वेळा निवडून दिलेले आहे. आठव्यांदा देखिल मी विजयी होईल. निवडणुकीत प्रकारची यामधे चुरस वाटली नाही.



विधानसभा निवडणुकीत आंबेगाव विधानसभा मतदारसंघात प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार आले नसल्याचा प्रश्न उपस्थित केल्यानंतर वळसे पाटील म्हणाले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थितांशी संवाद साधला होता. मी केलेल्या विकास कामाच्या जोरावर जनतेने निवडून द्यावे. असे आवाहन करून वळसे पाटील म्हणाले माझी कन्या पुर्वा वळसे पाटील हिने मंचर येथे प्रचाराच्या सांगता सभेत केलेले भाषण हे माझ्यासाठी अनपेक्षित होतं. तिने या आधी माझ्यासमोर कधी एवढे मोठे भाषण केलं नाही.ती गेली तीन-चार महिने रात्रंदिवस या निवडणुकीमध्ये काम करत होती. या निवडणुकीत कार्यकर्ते आणि मतदारांनी जो अभूतपूर्व पाठींबा दिला आहे.

# अनेक ठिकाणी ईव्हीएममध्ये बिघाड; मतदारांची निराशा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात आज लोकशाहीच्या उत्सवाला सुरुवात झाली आहे. आज सकाळी ७ पासून विधानसभा निवडणुकीसाठी मतदानाला सुरुवात झाली आहे. मात्र, आज राज्यात अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर ईव्हीएम बिघाडीच्या तक्रारी मिळाल्या. काही ठिकाणी मतदार रांगेत लागले होते. मात्र, मशीन सुरू न झाल्याने त्यांना माघारी जावे लागले. राज्यात सकाळी मतदान सुरू झाल्याच्या काही वेळातच अनेक ठिकाणावरून ईव्हीएम बिघडीच्या तक्रारी येऊ लागल्या. पुणे, कोल्हापूर, अकोला, संभाजी नगर आदी जिल्ह्यात नागरिकांनी ईव्हीएम बंद पाडल्याच्या तक्रारी केल्या. यामुले काही ठिकाणी मतदान सुरू होऊ शकले नाही. तर काही ठिकाणी अर्ध्या तासापेक्षा अधिक वेळ मतदान खोळंबले होते. त्यामुळे मतदान रखडले होते.



मुंबईत दादर येथे ईव्हीएम बंद पडल्याने मतदान खोळंबले होते. नाबर विद्यालयातील ईव्हीएम मशीन बंद पडले. मतदान सुरू होऊन अवघे १५ मिनिटे झाले असताना मशीन बंद पडले. यामुळे मतदारांचा खोळंबा झाला. तर शिवडीमध्येही ईव्हीएम मशीन बंद पडले होते. शिवडी-लालबाग विधानसभा मतदारसंघातील आरएम भट शाळेतील मतदान केंद्र क्रमांक ४१ ची मशीन बंद पडली होती. तर प्रबोधनकार ठाकरे उद्यान येथील मतदान केंद्रावर विद्युत पुरवठा अपूरा असल्यामुळे मतदान सुरू होऊ शकले नाही.

## मतदार व निवडणूक कर्मचाऱ्यांमध्ये 'तू तू-मैं मैं'

# मोबाइल बंदीमुळे केंद्रावर गोंधळ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आज राज्यभरात मतदान सुरू आहे. मात्र, वेगवेगळ्या कारणांमुळं मतदानात अडथळे येत आहेत. मोबाईल बंदीमुळं देखील काही ठिकाणी गोंधळ सुरू आहे. मतदार व निवडणूक कर्मचाऱ्यांमध्ये वादावादी सुरू आहे.

मतदान करण्यासाठी मतदान केंद्रामध्ये जाताना मोबाइल नेण्यास बंदी आहे. मात्र मोबाईल सोबत नसतो असं हल्ली होत नाही. त्यामुळं मतदानासाठी केंद्रात जाताना एकतर मोबाइल स्वीच ऑफ करायला सांगितला जात आहे किंवा बाहेर ठेवण्यास सांगितला जात आहे. नागरिकांना याबाबत आक्षेप असण्याचं कारण नाही. मात्र, मोबाइल नेमका ठेवायचा कुठं याची सोय अनेक ठिकाणी नसल्यामुळं गोंधळ उडत आहे.

### निवडणूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

● मतदान केंद्रावर मोबाईल बंदीला कोणाचाही आक्षेप नाही, मात्र मतदान होईपर्यंत मोबाईल बाहेर ठेवण्याची व्यवस्था करायला हवी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत. 'मतदान करायला अवघी चार ते पाच मिनिटं लागतात, तेवढा वेळ सुरक्षारक्षक मोबाईल ठेवू शकत नाहीत का, असाही प्रश्न केला जात आहे.



चांदिवलीतील एका मतदान केंद्रावर असाच प्रकार घडला. मतदानासाठी गेलेल्या एका नागरिकाला मोबाइल बाहेर ठेवण्यास सांगण्यात आलं. त्यानं प्रवेशद्वारावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याला मोबाइल कुठं ठेवू अशी विचारणा केली तर तुम्ही कुणाकडंही ठेवा, पण आत नेऊ नका, असं त्याला सांगण्यात आलं. त्यामुळं तो संतापला. त्यानं तिथल्या निवडणूक अधिकाऱ्याकडं विचारणा केली तर त्यानं तुम्ही मोबाईल आणलाच कशाला, अशी विचारणा केली. यातून बाचाबाची झाली. शेवटी संबंधित नागरिकानं दुसऱ्या एका व्यक्तीकडं मोबाइल ठेवून घाईघाईनं मतदान केलं.

# विश्ववेध

## मंगळाच्या वातावरणात ऑक्सिजनचे अणू


पृथ्वीचा शेजारचा लाल ग्रह मंगळ नेहमीच संशोधकांच्या कुतूहलाचा आणि संशोधनाचा विषय असतो. एकेकाळी मंगळावर वाहते पाणीही होते. एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी विकसित होण्यासाठी ग्रहाचा कठीण पृष्ठभाग, ताऱ्यापासूनचे योग्य अंतर, पाणी या मूलभूत गोष्टी असाव्या लागतात. त्याबरोबरच योग्य वातावरण व ऑक्सिजनसारख्या 'प्राणवायू'चीही गरज असते. विशेष म्हणजे, यापूर्वीच एका संशोधनात मंगळाच्या वातावरणात ऑक्सिजनचे अणू सापडलेले असून, हा शोध पृथ्वीपासून ४५ हजार फूट उंचीवर फिरणाऱ्या 'नासा'च्या सोफिया (स्ट्रॅटोस्फेरिक ऑब्झर्व्हेटरी फॉर इन्फ्रारेड अॅस्ट्रॉनॉमी) या फिरत्या प्रयोगशाळेने लावलेला आहे.



ही वेधशाळा विमानाला लावलेली आहे. त्याच्या मदतीने पृथ्वीच्या वर ४५ हजार फूट उंचीवर निरीक्षणे नोंदवली जात आहेत. मंगळाच्या वातावरणात अगदी वरच्या थरात म्हणजे मेसोस्फिअरमध्ये ऑक्सिजनचे अणू आहेत, असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. मंगळाच्या सुरुवातीच्या काळात वायू तेथून कसे निघून गेले, याचा अंदाजही त्यावरून येत आहे. मंगळावर ऑक्सिजनचे अणू सापडणे ही निश्चितच वेगळी घटना आहे, दुर्दैवाने मंगळावरील वातावरणात असलेला निम्माच ऑक्सिजन वैज्ञानिकांना आतापर्यंत सापडला आहे. वातावरणातील बदलांमुळे तेथे ऑक्सिजनचे प्रमाण कमी असावे, असे वैज्ञानिकांना वाटते. मंगळाच्या वातावरणात ऑक्सिजन सापडण्याची ही पहिली वेळ नाही. व्हायकिंग व मरीनर यानांनी तेथील ऑक्सिजन १९७० मध्ये शोधला होता. पृथ्वीच्या वातावरणावरून मंगळावरील वातावरणात असलेल्या ऑक्सिजनचा अंदाज लावता येणे कठीण आहे, असे सोफिया प्रकल्पातील वैज्ञानिक पामेला मारकम यांनी म्हटले होते. मंगळाच्या वातावरणातील आण्विक ऑक्सिजन मोजण्यास कठीण आहे, त्यासाठी अवरक्त किरणांच्या विविध तरंगांचे निरीक्षण करावे लागते. सोफिया प्रयोगशाळेत स्पेक्ट्रोमीटर असल्याने ते शक्य आहे. पृथ्वीवरील निळे आकाश, भरपूर बाष्प व दाट वातावरण यामुळे मंगळावरचा ऑक्सिजन गेल्या ४० वर्षांत शोधता आला नव्हता. पृथ्वीच्या वातावरणातून मंगळाचे निरीक्षण करता येते व त्या मदतीने मंगळावरील ऑक्सिजन शोधता आला. यातील सोफिया प्रयोगशाळा म्हणजे एक भले मोठे बोईंग विमान आहे. त्याला शंभर इंच व्यासाची दुर्बीण लावलेली आहे. सोफिया विमान पृथ्वीच्या वर ४५,००० फूट उंचीवर आहे त्यामुळे मधे कुठलेच अडथळे नसतात. सोफियाच्या मदतीने वैज्ञानिकांनी मंगळावरचे ऑक्सिजनचे अणू शोधण्यात यश मिळवले आहे. ◆◆◆

## जीवसृष्टीच्या आरंभाबाबत नवं संशोधन

पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरुवात कशी झाली, याबाबत सातत्याने संशोधन सुरू असते. धूमकेतू किंवा लघुग्रहांच्या पृथ्वीला झालेल्या धडकेतून पृथ्वीवर पाणी आले असावे, असे मानले जाते. आता एका नव्या संशोधनातून असे आढळले आहे की, एका मोठ्या आकाराच्या लघुग्रहाच्या धडकेमुळे पृथ्वीवर जीवसृष्टीची सुरुवात झाली. खरे तर मोठ्या उल्का आणि लघुग्रहांची धडक ही विनाशालाच कारणीभूत ठरत असते. अशाच एका लघुग्रहाच्या धडकेने पृथ्वीवरून डायनासोर नष्ट झाले होते. मात्र, या लघुग्रहापेक्षा २०० पट मोठ्या लघुग्रहाच्या धडकेनंतर पृथ्वीवर जीवसृष्टी विकसित होण्यास मदत झाल्याचे नव्या संशोधनात आढळले आहे. या लघुग्रहाचे नाव 'अॅस्टेरॉईड एस २' असे आहे. ही एक अतिशय मोठी अवकाशीय शिळा आहे, जिचा आकार माऊंट एव्हरेस्टपेक्षा चौपट मोठा आहे. या लघुग्रहाच्या धडकेचा पृथ्वीवर मोठाच प्रभाव पडला. विशेषतः महासागरांवर हा प्रभाव महत्त्वाचा ठरला. एस२ चा २०१४ मध्ये सर्वप्रथम शोध घेण्यात आला होता. हा लघुग्रह सुमारे ३.२६ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वीला धडकून पुढे गेला होता. पीएनएएसमध्ये प्रकाशित एका लेखात म्हटले आहे की हा लघुग्रह एस २ पृथ्वीला धडकला त्यावेळी महासागर जणू काही उकळले आणि मोठी सुनामी आली. अलीकडेच वैज्ञानिकांनी पृथ्वीवरील या धडकेचा प्रभाव जाणून घेण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या बार्बरटन ग्रीनस्टोन बेल्टमध्ये या लघुग्रहाच्या धडकेने बनलेल्या विवराचा अभ्यास केला. टीमने तेथील २२० पौंड खडकांचे नमुने गोळा केले आणि त्यांचा प्रयोगशाळेत अभ्यास केला.



त्यामध्ये आढळले की एस२ च्या धडकेने निर्माण झालेल्या सुनामीच्या लाटा समुद्रात ओसरल्या आणि त्याबरोबरच जमिनीवरील ढिगारा तटीय क्षेत्रांमध्ये वाहून आला. समुद्राच्या पृष्ठभागाचा स्तर बाष्पीभूत होऊन वातावरणाला उष्ण करू लागला. त्यामुळे तापमानात अत्याधिक बदल घडले. संशोधकांना खडकांमध्ये असेही पुरावे मिळाले, ज्यामुळे समजले की सुनामीने लोह आणि फॉस्फरससारख्या पोषक घटकांनाही नष्ट केले होते. संशोधकांना वाटते की, या घटनेने जीवनाच्या विकासासाठी आश्चर्यकारकरीत्या प्रेरित केले असावे. मुख्य संशोधक आणि हार्वर्ड विद्यापीठाचे भूवैज्ञानिक नादजा ड्रेबोन यांनी सांगितले, पृथ्वीच्या प्रारंभिक काळात मोठ्या उल्का किंवा लघुग्रहांच्या सातत्याने प्रभाव पडत होता. त्यांनी प्रारंभिक जीवसृष्टीच्या विकासाला प्रेरित केले असावे; पण ते कसे हे माहिती नव्हते. लोह तत्त्व हे सर्वसाधारणपणे उथळ पाण्यात दुर्मीळ असते; पण मोठ्या सुनामीने ते खोल समुद्रातून बाहेर आणले व तटीय क्षेत्रामध्ये हे महत्त्वाचे पोषक तत्त्व भरून गेले. त्यामुळे जीवसृष्टीला चालना मिळाली. ◆◆◆

## थ्रीडी प्रिंटर बनवणार पोषक पदार्थ

अन्न तयार करण्यासाठीच्या तंत्रज्ञानातही आता अनेक नव्या सुधारणा होत आहेत. आता तर कॉफी मशिनसारखा खाद्यपदार्थ बनवणारा त्रिमिती प्रिंटरही बनवण्यात आलेला आहे. यामध्ये सॉफ्टवेअरचा वापर केलेला असून, खाद्य वाटणे, जेल, पावडर, द्रव घटक यांचा वापर करून यामध्ये संगणकाच्या मदतीने अन्नपदार्थ तयार करता येतात. तसेच त्यांना हवा तसा आकारही देता येतो. अन्नासाठीच्या त्रिमिती प्रिंटरने पारंपरिक स्वयंपाक पद्धतीला पर्याय निर्माण झालेला असला, तरी पारंपरिक पद्धतही अबाधितच राहणार, यात शंकाच नाही!

नवीन पद्धतीने पोषणाच्या सर्व गरजा भागवता येतील किंवा आपण जे पदार्थ खातो ते सर्वच यामध्ये शिजवता येतील, असे नाही. मात्र, त्यामुळे तुम्हाला व्यक्तिगत गरजेनुसार हवे तसे पोषणमूल्य असलेले अन्न मागणीनुसार तयार करता येईल. यामध्ये स्वयंपाकासाठी लागणारे घटक छोट्या शीतकुप्यांमध्ये असतील व त्यांच्या मदतीने आपण जशा आज्ञा देऊ तशा चवीचे व आकाराचे खाद्यपदार्थ तयार करता येतील, असे अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाचे हॉड लिप्सन यांनी म्हटले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात अन्न पदार्थ बनवणेही



शक्य होईल. डिजिटल रेसिपी यामध्ये वापरली जाईल. व्यक्तिगत आरोग्य माहितीच्या आधारे तुमचे खाद्यपदार्थ तयार करणारे अन्नर्निमितीचे हे अॅप असणार आहे. यामध्ये अन्नाच्या प्रिंटरला म्हणजे त्याचा आकार ठरवणाऱ्या यंत्राला यांत्रिक हात जोडलेला असून, त्यामध्ये गोठवलेल्या घटकांचे आठ कप्पे आहेत. त्यामध्ये अन्नघटक शीत नसावेत, यासाठी इन्फ्रारेड पद्धतीने ते तापवण्याचीही व्यवस्था केली आहे. ◆◆◆

## मोड आलेल्या मेथीचे लाभ

मेथी दाणे असोत किंवा मेथीची हिरवीगार भाजी, त्यांचे आरोग्यविषयक महत्त्व बरेच आहे. विशेषतः मोड आलेली मेथी आरोग्यासाठी अनेक प्रकारे लाभदायक ठरते, असे तज्ज्ञ सांगतात. मोड आलेल्या मेथीमध्ये आवश्यक जीवनसत्त्व, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. तसेच हे व्हिटॅमिन–सी, ए ने समृद्ध असून आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी फायदेशीर आहे. मोड आलेल्या मेथीच्या सेवनाचे हे काही लाभ...




**पचनासाठी फायदेशीर :** मोड आलेल्या मेथीमधील उच्च फायबर सामग्री पचनास मदत करून आणि कफ रोखून निरोगी पचन तंत्राला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

**रक्तातील साखरेचे व्यवस्थापन :** मोड आलेली मेथी रक्तातील साखर नियंत्रित ठेवते. हे मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर आहे.


**संरक्षण :** मोड आलेली मेथी अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी कंपाऊंडने परिपूर्ण असतात, जे संपूर्ण शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर आणि विविध आरोग्य समस्या कमी करण्यासाठी योगदान ठरू शकते.

**हृदयाचे आरोग्य :** अंकुरित मेथी कोलेस्टेरॉलची क्षमता कमी करण्यास फायदेशीर ठरू शकते, जे हृदयविकारापासून बचाव करतात. तसेच कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असल्यामुळे मोड आलेली मेथी परिपूर्णतेची भावना वाढवू शकते.



**रोगप्रतिकारशक्ती :** मोड आलेली मेथी शरीरात संरचना असलेले व्हिटॅमिन–सी तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. मोड आलेल्या मेथीमध्ये फायटोएस्ट्रोजन गुण असतात, जे हार्मोनल समतोल राखतात. मोड आलेली मेथी हे कॅल्शियम आणि इतर खनिजांचे साधन आहेत, जे मजबूत हाडांसाठी फायदेशीर आहे. ◆◆◆

## तीस टन वजनाची उल्का!



पृथ्वीवर अनेक वेळा उल्कावर्षाव होत असतो. अर्थात, पृथ्वीच्या वातावरणात येताच या अवकाशीय शिळा जळून त्यांचे छोटे तुकडेच जमिनीपर्यंत येत असतात. मात्र, पृथ्वीवर काळाच्या ओघात काही मोठ्या उल्काही कोसळलेल्या आहेत. अशीच एक उल्का अर्जेंटिनातील कॅम्पो डेल सिएलो येथे उत्खननात सापडली होती. या उल्केचे वजन तब्बल तीस टन इतके आहे. ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी उल्का असल्याचे काहींचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे हा उल्कापाषाण अखंड आहे. कॅम्पो डेल सिएलो या ब्युनोस आयर्सच्या उत्तरेला असलेल्या भागात सापडलेला हा उल्कापाषाण मोठा असून, त्यामुळे २६ विवरे तयार झालेली आहेत. ४ ते ५ हजार वर्षांपूर्वी हा उल्कापाषाण पडला असावा. त्याची पहिली नोंद स्पॅनिश गव्हर्नरांनी १५७६ मध्ये केली असून, काही लोक लोहखनिज गोळा करीत असताना त्यांना तो त्या वेळी दिसल्याचे सांगण्यात येते.

हे लोह आकाशातून पडलेले आहे, असे त्यांनी म्हटले होते व स्पॅनिश अधिकाऱ्यांना उल्कापाषाण कोसळला ते ठिकाण दाखवले होते. कॅप्टन डी मिरावेल यांच्या नेतृत्वाखालील मोहिमेत काही लोहयुक्त उल्कापाषाण आणण्यात आले. त्यातील मेसॉन ३ फिरो हा सर्वात मोठा लोहयुक्त उल्कापाषाण होता. कॅम्पो डेल सिएलो उल्कांमुळे काही छोटी विवरेही तयार झाली. त्यात ७८ बाय ६५ मीटरचे विवर सर्वात मोठे आहे. उल्कापाषाणाचे वजन मोजण्यासाठी काही शास्त्रीय पद्धती आहेत. त्यांची खनिजरचना व कालावधीही सांगता येतो. आतापर्यंत सापडलेला सर्वात मोठा उल्कापाषाण हा होबा नावाचा असून, त्याचे वजन ६० टन होते; तर तो नामिबियातील एका शेतात पडला होता. ८० हजार वर्षांपूर्वी तो जेथे पडला तेथेच तो अजून आहे. अॅस्ट्रॉनॉमी असोसिएशन ऑफ चॅको या संस्थेने अलीकडेच एक मोठा उल्कापाषाण शोधला असून, तो १९६७ मध्ये सापडलेल्या ३७ टनांच्या उल्कापाषाणापेक्षा मोठा आहे. आतापर्यंत दुसरा मोठा उल्कापाषाण कोणता याबाबत वाद आहेत. अर्जेंटिनात जगातील तीन मोठ्या उल्कापाषाणांपैकी दोन आहेत. ◆◆◆

## मधुमेहाच्या रुग्णांसाठी किवी फळ गुणकारी




भारताला सध्या 'मधुमेहाची जागतिक राजधानी' असेच म्हटले जाते. आपल्या देशात मधुमेहाच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मधुमेह झाला असेल, तर तुम्हाला कोणत्याही गोष्टीचे सेवन करताना काळजी घेण्याची गरज असते. अशा परिस्थितीत तुम्ही किवीला तुमच्या आहारात समाविष्ट करू शकता. तुमच्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे, असे आहारतज्ज्ञ सांगतात. यामध्ये कमी ग्लायसेमिक निर्देशांक आहे आणि यामुळे इतर अन्नपदार्थांमधून ग्लुकोज शोषण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांना याचा खूप फायदा होऊ शकतो. किवीचा ग्लायसेमिक इंडेक्स स्कोअर सुमारे ५० आहे आणि त्यामुळे तुम्हाला त्याच्या सेवनामुळे रक्तातील साखर वाढण्याची समस्या भेडसावत नाही. कमी 'जीआय' अन्नपदार्थ रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात. किवीचे हे काही फायदे...

**व्हिटॅमिन सी समृद्ध –** किवी हे व्हिटॅमिन सीने समृद्ध असलेले फळ आहे. यात अँटिऑक्सिडेंट गुणधर्म आहेत, जे ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करण्यास मदत करतात. मधुमेहाच्या रुग्णांमध्ये ही समस्या खूप सामान्य आहे. ज्यामुळे केवळ हृदयविकारच नाही, तर मज्जातंतूंनाही नुकसान होऊ शकते. व्हिटॅमिन सी मुळे तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**उच्च फायबर –** किवीमध्ये विरघळणारे फायबर आढळते. त्यामुळे किवीच्या सेवनाने रक्तातील साखरेचे शोषण कमी होते. किवी पचनासाठी देखील फायदेशीर आहे आणि बद्धकोष्ठता आणि इतर पाचन तंत्राशी संबंधित समस्या टाळण्यास मदत करते.

**कमी कर्बोदके –** फळांमध्ये कार्बोहायड्रेट मुबलक प्रमाणात आढळतात. पण, इतर फळांच्या तुलनेत किवीमध्ये कमी कर्बोदके असतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हा एक चांगला पर्याय आहे. जर तुम्हाला तुमच्या रक्तातील साखरेची काळजी न करता फळांचा आस्वाद घ्यायचा असेल, तर किवीचे सेवन जरूर करावे, असे तज्ज्ञ सांगतात.

**वजन कमी करण्यास उपयुक्त –** किवीमध्ये फायबरचे प्रमाण जास्त आणि कॅलरीज कमी असल्याने मधुमेहाच्या रुग्णांना त्यांचे वजन कमी करायचे असेल किंवा ते टिकवून ठेवायचे असेल, तर किवीला आपल्या आहाराचा भाग बनवा. तुमचे वजन नियंत्रित करून ते रक्तातील साखरेची पातळी कमी करतील. ◆◆◆

## लेसरद्वारे बनणार नवे ग्राफिन सर्किट

ग्राफिनवर लेसर प्रक्रिया करून त्याचा वापर कमी किमतीच्या कागदावर आधारित असलेल्या इलेक्ट्रॉनिक्समध्ये करता येऊ शकेल. याबाबतच्या संशोधनात एका भारतीय वैज्ञानिकाचाही समावेश आहे. नवीन लेसर तंत्रज्ञानामुळे ग्राफिन सर्किटस्ची निर्मिती शक्य आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. ग्राफिन हा बहुगुणी रासायनिक पदार्थ असून, तो विद्युत व उष्णता यांचा वाहक आहे. तो मजबूत व स्थिर असून, त्याचे पदार्थविज्ञानातील गुणधर्म प्रत्यक्ष वापरात आणले जाणार आहेत.



इंकजेट प्रिंटरच्या मदतीने बहुस्तरीय ग्राफिनवर सर्किट तयार करता येते, त्यात इलेक्ट्रोड्सचाही वापर असतो. त्यामुळे लवचिक व परिधेय इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करता येतात. आताच्या तंत्रज्ञानात यामध्ये काही अडचणी आहेत. त्यात विद्युत वहनशीलता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी वेगळ्या उपाययोजना कराव्या लागतात. त्यासाठी जास्त तापमान व वेगळी रसायने लागतात. त्यात प्लास्टिक फिल्म्स व कागदाचा वापर केला जातो. आयोवा स्टेट विद्यापीठातील सहायक प्राध्यापक जोनाथन क्लॉसेन व संशोधक विद्यार्थी सुप्रेम दास यांनी लेसरच्या मदतीने ग्राफिनवर सर्किटस्? काढण्याचे तंत्र विकसित केले आहे. इंकजेट प्रिंटिंगने सर्ट काढता येतात व त्यात पल्सड लेसर पद्धतीने कागद, बहुवारिक किंवा इतर पदार्थांची हानी न करता विद्युतवहनशीलता वाढवता येते. इंकजेट प्रिंटेड ग्राफिनचा वापर संवहनशील पदार्थ म्हणून करता येतो हे यात दाखवून दिले आहे, असे क्लॉसेन यांनी सांगितले. यात जैविक संवेदक, ऊर्जा साठवण प्रणाली, विद्युत वाहक घटक तसेच कागदावर आधारित इलेक्ट्रॉनिक सर्किट्सची निर्मिती शक्य होणार आहे. यात ग्राफिन ऑक्साईडचे रूपांतर ग्राफिनमध्ये केले जाते. ग्राफिनचे पापुद्रे एकत्र चिकटवून विद्युत वहनशीलता हजारो पटींनी वाढवली जाते. दास यांच्या मते उच्च ऊर्जा फोटॉन ग्राफिनची हानी करीत नाहीत. लेसरने त्याचे त्रिमिती व सपाट पृष्ठभाग तयार करता येतात. त्रिमिती भाग हे पाकळ्यांसारखे असतात. रासायनिक व जैविक संवेदकांसाठी हे तंत्रज्ञान उपयोगी आहे. ◆◆◆

## वाचनकौशल्यासाठी द्या पोषक आहार

आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी पोषक आहार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. विशेषतः लहान मुलांच्या वाढीसाठीही पोषक आहाराचे महत्त्व मोठे आहे. मुलांची बुद्धिमत्ता, आकलनशक्ती यावरही असा आहार परिणाम करीत असतो. आरोग्यदायी अन्नपदार्थ सेवनाने मुलांचे वाचन कौशल्य वाढू शकते, असे संशोधकांनी म्हटले आहे.

शाळेच्या पहिल्या तीन वर्षांत मुलांना चांगला आहार दिला, तर त्यांचे वाचनकौशल्य सुधारते, असा त्यांचा दावा आहे. फिनलंडमधील जावस्कल्या विद्यापीठ व इस्टर्न फिनलंड विद्यापीठ या संस्थांतील वैज्ञानिकांनी सहा ते आठ वयोगटातील १६१ मुलांची पाहणी केली असता, त्यांना पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांच्या वाचन कौशल्यात आहारामुळे सुधारणा दिसून आली. यात त्या मुलांनी केलेल्या आहाराच्या टिप्पणीचा वापर करण्यात आला. त्यात काही प्रमाणित चाचण्या वापरण्यात आल्या. बाल्टिक सागरी भोजन व फिनीश पोषण आहार यांची शिफारस त्यात करण्यात आली आहे. मुलांना भाज्या, फळे, बेरी, मासे, पूर्ण अन्नधान्ये व असंपृक्त मेद, शर्करायुक्त पदार्थ दिले तर ते आरोग्यास चांगले मानले जातात. ज्यांच्या आहारात हे पदार्थ नसतात त्यांच्या वाचनकौशल्यावर परिणाम होतो.



या अभ्यासात असे दिसून आले की, दुसरी व तिसरीच्या मुलांमधील वाचनकौशल्ये त्यामुळे वाढली. त्यांची पहिलीतील वाचनकौशल्ये काहीही असली तरी त्यांच्यात ही सुधारणा दिसून आली आहे. आरोग्यवर्धक आहारामुळे पहिल्या इयत्तेपासून वाचनकौशल्ये सुधारतात. ज्यांचा आहार चांगला नसतो त्यांची कौशल्ये फार चांगली असत नाहीत. सामाजिक–आर्थिक स्थिती, शारीरिक हालचाली, शारीरिक तंदुरुस्ती हे घटकही यात महत्त्वाचे ठरतात, असे संशोधक एरो हापला यांनी सांगितले. ◆◆◆

## अखिलेश यादव यांच्या तक्रारीनंतर निवडणूक आयोगाची कारवाई

# उत्तर प्रदेशात पक्षपाती अधिकाऱ्यांचे निलंबन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ :** उत्तर प्रदेशमध्ये सुरू असलेल्या पोटनिवडणुका दरम्यान, भारतीय निवडणूक आयोगाने कठोर कारवाई करत अनेक अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा आदेश दिला. उत्तर प्रदेश पोटनिवडणुकीत काही समुदायांना मतदान करण्यापासून रोखण्यात आल्याच्या समाजवादी पक्षाने 'सोशल मीडिया'वर केलेल्या तक्रारींची दखल घेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी उत्तर प्रदेशचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना (डीईओ) कडक सूचना दिल्या आहेत. निवडणूक आयोगाने सर्व तक्रारींची तात्काळ दखल घेऊन तत्काळ कारवाई करा, तसेच तक्रारदाराला टॅग करून कोणत्याही पात्र मतदाराला मतदान करण्यापासून रोखू नये, असे म्हटले आहे.



● ओळी-रांचीः मांडू विधानसभा मतदारसंघातील मतदान यंत्र काही तास बंद पडल्याने नागरिकांना रांगेत थांबून राहावे लागले.

कोणत्याही प्रकारची पक्षपाती वृत्ती खपवून घेतली जाणार नाही आणि तक्रार आल्यानंतर कोणी दोषी आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. अधिकाऱ्यांवर कारवाई केली निवडणूक आयोगाने सर्व ९ जिल्ह्यांमध्ये तैनात असलेल्या पोलिस आणि सामान्य निरीक्षकांना मतदान शांततेत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी कडक लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. कानपूरमधील अखिलेश यादव यांच्या तक्रारीची दखल घेत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशमध्ये सुरू असलेल्या पोटनिवडणुकीत प्राप्त झालेल्या विविध तक्रारींवर कारवाई करत निवडणूक आयोगाने मतदारांची तपासणी आणि मतदारांना मतदान करण्यापासून रोखणाऱ्या निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

लखनऊमध्ये एका पत्रकार परिषदेत अखिलेश म्हणाले, की कुंडरकी पोलिस ठाण्याच्या प्रभारी प्रदीप सेहरावत, एडीएम मुरादाबाद, आयुक्त अंजनेय, सिसामऊ डीएसपी दिनेश त्रिपाठी, इन्स्पेक्टर चमन गंज दिनेश बिश्त, रमेश श्रीवास्तव आदी अधिकारी गडबड करत आहेत. भाजपपेक्षा लबाड कोणी नाही. भाजपचे मतदार स्वबळावर फिरकत नाहीत. उत्तर प्रदेशात विधानसभेच्या नऊ जागांसाठी पोटनिवडणुकीसाठी मतदान सुरू आहे. या नऊ जागांपैकी मुझफ्फरनगरमधील मीरापूर, मुरादाबादमधील कुंदरकी, कानपूरमधील सिसामऊ आणि मैनपुरीमधील करहल या चार जागांवर मतदान सुरू झाल्यानंतर काही वेळातच गोंधळ झाला. काही ठिकाणी पोलिसांवर मुस्लिम महिलांचे नकाब काढल्याचा तर काही ठिकाणी बनावट मतदानाचा आरोप करण्यात आला. सर्वप्रथम मीरापूर परिसरात खळबळ उडाली. काक्रोळी येथील बसस्थानकाजवळील पोलिस पथकावर छतावरून दगडफेक करण्यात आली. दगडफेकीत एक जवान जखमी झाला. किसान इंटर कॉलेजमध्ये मतदान करण्यासाठी आलेल्या लोकांनी त्यांना मतदानापासून रोखल्याचा आरोप केला. आधारकार्ड आणि इतर कागदपत्रे असूनही लोकांना मतदान करू दिले नाही.

मीरापूर, मुझफ्फरनगर येथील काकरोली येथील बसस्थानकाजवळील पोलिस पथकावर छतावरून दगडफेक करण्यात आली. यापूर्वी किसान इंटर कॉलेजमध्ये मतदानासाठी आलेल्या लोकांनी त्यांना मतदानापासून रोखल्याचा आरोप केला होता. आधारकार्ड आणि इतर कागदपत्रे असूनही लोकांना मतदान करू दिले नाही. लोकांनी संताप व्यक्त केला. काही वेळाने पोलिसांचा ताफा बसस्थानकाजवळून गेला असता दगडफेक करण्यात आली.

ज्या भागात दगडफेक झाली तो भाग मुस्लिमबहुल आहे. दगडफेकीत कॉन्स्टेबल विक्रांत जखमी झाला आहे. त्याच्या हाताला दुखापत झाली आहे. खासदार डिंपल यादव यांनी आरोप केला की, मैनपुरीच्या करहल विधानसभेतील पोलिस सरकारच्या इशाऱ्यावर मतदारांवर दबाव आणत आहेत. निवडणूक आयोग लोकशाहीशी खेळत असल्याचा आरोप डिंपल यांनी केला आणि या प्रकरणाची दखल घेण्याची मागणी केली.

### निकाब काढण्यावरून गदारोळ

● कानपूरच्या सिसामाऊ विधानसभा मतदारसंघात पोलिसांनी मुस्लिम महिलांवर त्यांचा निकाब काढून स्वतःची ओळख दाखवल्याचा आरोप केला. यावरून मोठा गदारोळ झाला होता. अखिलेश यादव यांनी पोलिस प्रशासनावर मतदानात व्यत्यय आणल्याचा आरोप केला. त्यांच्या पोस्टनंतर निवडणूक आयोगाने उपनिरीक्षक अरुण कुमार आणि राकेश नाडर यांच्यावर कारवाई केली.

# हवाई हल्ल्याचा धोका ! युक्रेनमधील अमेरिकेचे दूतावास बंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कीव :** रशियन हवाई हल्ल्याच्या इशाऱ्यानंतर घेतला निर्णय युक्रेन-रशिया युद्ध अधिक धोकादायक होत आहे. जो बायडेन यांनी युक्रेनला घातक क्षेपणास्त्रे वापरण्याची परवानगी दिल्यानंतर युक्रेनने रशियावर अमेरिकन 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्रांनी हल्ला केला, त्यानंतर अमेरिकेने आज सुरक्षेच्या कारणास्तव कीवमधील आपला दूतावास बंद केला आहे.





'यूएस डिपार्टमेंट ऑफ स्टेट कॉन्सुलर अफेयर्स'ने एका निवेदनात म्हटले आहे, की संभाव्य हवाई हल्ल्याच्या चिंतेमुळे बुधवारी (ता. २०) कीवमधील अमेरिकन दूतावास बंद करण्यात आला आहे. कीव दूतावासाच्या वेबसाइटवर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की खूप सावधगिरी बाळगून, दूतावास बंद करण्यात येत आहे आणि दूतावासातील कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, निवेदनात, अमेरिकन नागरिकांना हवाई सतर्कतेची घोषणा झाल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जाण्यास तयार राहण्यास सांगितले आहे. एक दिवस आधी युक्रेनने रशियावर अमेरिकन 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्रांनी हल्ला केला होता.

बायडेन यांनी युक्रेनला त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या दिवसांत प्राणघातक अमेरिकन शस्त्रे वापरण्याची परवानगी दिल्यानंतर या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राचा वापर करण्यात आला आहे. युद्धाने नव्या युगात प्रवेश केला आहे. रशियाने अमेरिकेच्या 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्र हल्ल्याला युद्धातील एक मोठा बदल म्हणून घेतले असून युद्ध एका नव्या टप्प्यात दाखल झाल्याचे म्हटले आहे. पुतीन यांनी यापूर्वीच रशियावर कोणत्याही हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा दिला असून, त्यांनी थेट 'नाटो' देशांना लक्ष्य करण्याची धमकीही दिली आहे.

### मोठ्या युद्धाचे संकेत

पुतीन प्रशासनानेही रशियाच्या आण्विक सिद्धांतातील बदलांना मंजुरी दिली. देशात अण्वस्त्रविरोधी मोबाइल निवारे बांधण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. युद्धातील या विस्तारावरून असे दिसते, की कधीही मोठे युद्ध होऊ शकते.



## » Selected

### माजी मंत्री अनिल जोशी अकाली दलातून बाहेर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड :** ज्येष्ठ नेते अनिल जोशी यांनी शिरोमणी अकाली दलाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी पक्षाचे कार्याध्यक्ष बलविंदर सिंग भूंदर यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आहे. प्रकाशसिंग बादल यांची अकाली दलाकडे असलेली दूरदृष्टी आता संपली असून सुखबीरसिंग बादलही त्याकडे लक्ष देत नसल्याचे जोशी म्हणाले. जातीय सलोखा वाढवण्यासाठी कोणतीही चर्चा किंवा प्रयत्न केले जात नाहीत. जोशी यांनी पुढे टिप्पणी केली, की अकाली दल आता फक्त पंथक राजकारणावर लक्ष केंद्रित करत आहे आणि आपल्या राजकीय दृष्टिकोनात गोंधळलेले दिसत आहे. २०२१ मध्ये त्यांची भाजपतून पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती.



### बिहारमधील शिक्षकांना सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** बिहारमधील एक लाख १४ हजार १३८ नोकरदार शिक्षकांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळाला आहे. यासाठी पाटणासह अनेक जिल्ह्यांमध्ये नियुक्ती पत्र वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गया, भोजपूर, कैमूर, सीतामढी, वैशाली, मुझफ्फरपूर येथे आचारसंहिता लागू झाल्यामुळे येथे नियुक्ती पत्र वितरणाचा कार्यक्रम होत नाही. पाटणा येथे सीएम नितीश कुमार, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, मंत्री विजेंद्र यादव, मंत्री विजय चौधरी, मंत्री सुनील कुमार यांनी योग्यता चाचणी उत्तीर्ण झालेल्या नोकरदार शिक्षकांना नियुक्ती पत्र दिले. ज्या शिक्षकांनी योग्यता चाचणी उत्तीर्ण केली, त्यांना राज्य कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळाला. यापुढे त्यांना विशेष शिक्षक म्हटले जाईल

### टॉयलेट क्लिनर पिल्याने मद्यपी वृद्धाचा मृत्यू



**डेहराडून :** उत्तराखंडमधील पौडी जिल्ह्यात दारूच्या नशेत एका वृद्धाने 'टॉयलेट क्लीनर' प्यायल्याने त्याचा मृत्यू झाला. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले, की भगवान सिंग (वय ६७) असे मृताचे नाव असून तो येथील जामला गावचा रहिवासी होता. पौरी पोलिस ठाण्याचे प्रभारी अमरजीत सिंह यांनी कुटुंबीयांच्या हवाल्याने सांगितले, की आपल्या भाचीच्या लग्न समारंभात सहभागी होऊन घरी परतलेल्या सिंहने चुकून मद्यधुंद अवस्थेत 'टॉयलेट क्लिनर' प्यायले.

# भाजप नेत्याच्या लग्नात गोंधळ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात भारतीय जनता युवा मोर्चाचे (बीजेवायएम) जिल्हाध्यक्ष भूपेंद्र सोहागपुरे यांचा विवाह पुढे ढकलण्यात आला. एका शिक्षिकेने भूपेंद्र याच्यावर बलात्कारासह गंभीर आरोप केले. महिला शिक्षिकेच्या तक्रारीवरून पोलिसांनी भूपेंद्र याच्याविरुद्ध लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार, जीवे मारण्याची धमकी आणि 'अॅट्रासिटी'चा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांना दिलेल्या तक्रारीत पीडितेने सांगितले, की ती माध्यमिक शिक्षिका आहे. २००८ मध्ये ती एका खासगी महाविद्यालयातून बीएड करत होती. त्या वेळी तिच्यासोबत भूपेंद्र सोहागपुरेही शिकत होते. यादरम्यान भूपेंद्रने तिला मागणी घातली; पण मी नकार दिला. तीन वर्षांपासून त्याने तिच्यावरचे प्रेम अनेकवेळा व्यक्त केले. र बोलण्यासाठी दबाव टाकला; पण तिने नकार दिला. सुमारे चार वर्षांनंतर १७ डिसेंबर २०१२ रोजी तिने त्याचा प्रस्ताव स्वीकारला. त्यादरम्यान भूपेंद्रने तिच्याशी लग्न करण्याचे वचन दिले.

पीडितेने सांगितले, की २०१३ ते २०२० दरम्यान तिची सिंगरौली जिल्ह्यातील एका शाळेत नियुक्ती झाली होती. या वेळी ती घरी आल्यावर भूपेंद्रने तिला त्याच्या एका मित्राच्या खोलीत नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. तो प्रत्येक वेळी संबंध ठेवायचा आणि लग्नाची चर्चा पुढे ढकलत असे. ऑगस्ट २०२० मध्ये तिची बालाघाट येथे बदली झाल्यानंतरही हाच ट्रेंड कायम होता. भूपेंद्र येथे तिच्या भाड्याच्या खोलीत येऊन शारीरिक संबंध ठेवायचा. दरम्यान, भूपेंद्रचे दुसऱ्या महिलेशी संबंध असल्याची माहिती तिला मिळाली; मात्र त्याने तिला (दुसऱ्या मुलीला) आपले नातेवाइक म्हटले.पीडितेने सांगितले, की याचदरम्यान १६ नोव्हेंबरला भूपेंद्रचे लग्न होणार असल्याचे तिला समजले. ती तिथे पोचली. साखरपुडा सुरू असताना तिने पोलिसांना फोन केला.

### लग्न पुढे ढकलले, पदही धोक्यात

● भूपेंद्र सोहागपुरे यांच्यावर बलात्कारासह गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांचे लग्न पुढे ढकलण्यात आले. आता भूपेंद्र यांचेही पद धोक्यात आले आहे. याबाबत चर्चा करूनच काही निर्णय घेतला जाईल, असे भाजपचे जिल्हाध्यक्ष रामकिशोर कावरे यांनी सांगितले.

## भाजपला भगव्याची अॅलर्जी

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**जयपूरः राजस्थान :** भाजपच्या 'भाजप जाणून घ्या' कार्यक्रमांतर्गत राज्यातील पदाधिकारी वेगळ्या स्टाईलमध्ये दिसले. या वेळी पदाधिकाऱ्यांनी पारंपारिक भगव्या उपरण्याऐवजी पांढऱ्या रंगाचे उपरणे घातले होते.

## झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा की भाजप युती?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**झारखंड :** झारखंडमधील विधानसभा निवडणुकीचा दुसरा टप्पा आज (२० नोव्हेंबर) रोजी पार पडला. ही निवडणूक प्रामुख्याने रोजगार, विकास, महागाई, भ्रष्टाचार, घराणेशाही, घुसखोरी या मुद्द्यांवर लढली गेली. सुमारे ६८ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

मॅट्रिझ एक्झिटचा एक्झिट पोल काय सांगतो ?

२०१९ च्या झारखंड निवडणुकीत काँग्रेस आणि झारखंड मुक्ती मोर्चाचा समावेश असलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडीने (यूपीए) विजय मिळवला होता. झामुमोला ३०, भाजपला २५ आणि काँग्रेसला १६ जागा मिळाल्या होत्या

मॅट्रिक्सच्या एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार यावेळी झारखंडमध्ये भाजपप्रणित एनडीए सरकार स्थापन करू शकते. मॅट्रिझ एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार झारखंडमधील ८१ जागांपैकी एनडीएला ४६ आणि इंडिया आघाडीला २९ जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर ६ जागा इतरांच्या खात्यात जाऊ शकतात.

# उत्तर प्रदेशात मतदानादरम्यान मुलीची हत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ :** उत्तर प्रदेश कन्हाल विधानसभा जागेवर मतदानादरम्यान दलित मुलीची हत्या करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. कुटुंबीयांनी समाजवादी पक्षाच्या नेत्यांवर केला आहे. याप्रकरणी भाजपही आक्रमक झाला आहे. याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी भाजपचे उमेदवार अनुजेश यादव यांनी केली आहे.

समाजवादी पक्षाने मतदान करण्यास नकार दिल्याने तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप मृत तरुणीच्या कुटुंबीयांनी केला आहे. मृत्यूपूर्वी तिच्यावर बलात्काराचा आरोपही केला होता. मोहल्ला जटवण परिसरात बंद गोणीत मुलीचा मृतदेह आढळून आला. कुटुंबीयांनी सांगितले, की मतदानापूर्वी समाजवादी पक्षाचे समर्थक प्रशांत यादव आणि त्यांचे सहकारी त्यांच्याकडे आले होते. त्यांनी त्यांना सायकलवरून मतदान करण्यास सांगितले होते; परंतु मुलीने तसे करण्यास नकार दिला आणि भाजपला मतदान करणार असल्याचे सांगितले.

या घटनेबाबत मुलीच्या वडिलांचे वक्तव्य शेअर करताना भाजपने म्हटले आहे, की कन्हाललमध्ये प्रशांत यादव आणि त्यांच्या साथीदारांनी एका दलित मुलीची हत्या केली कारण तिने समाजवादी पक्षाला सायकलवरून मतदान करण्यास नकार दिला होता.

सैफई कुटुंब आणि अखिलेश यादव यांचे गुंड मैनपुरीत पुन्हा दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रकरणाचे पडसाद आता दिल्लीपर्यंत उमटत आहेत.

## १२ दिवसांत १९ जणांचा मृत्यू; इंटरनेट, मोबाईल सेवा बंद

# मणिपूर पुन्हा हिंसाचाराच्या विळख्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इंफाळ :** मणिपूरमध्ये मैतेई आणि कुकी समुदायांमध्ये सुरू असलेला हिंसाचार थांबत नाही आहे. १९ महिन्यांपूर्वी सुरू झालेला हा संघर्ष आता पुन्हा चिघळू लागला आहे. गेल्या १२ दिवसांत हिंसाचारात १९ जणांचा मृत्यू झाला असून, गेल्या वर्षभरात हा आकडा २५० च्या पुढे गेला आहे. हिंसाचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने इम्फाळ पश्चिम,



इम्फाळ पूर्व, बिष्णुपूर, ककचिंग, कांगपोकपी, थौबल आणि चुराचंदपूर या सात जिल्ह्यांतील इंटरनेट आणि मोबाइल सेवेवरील बंदीपर्यंत वाढवली आहे. संचारबंदी आणि शाळा आणि महाविद्यालयेही बंद आहेत.

'एनपीपी'ने पाठिंबा काढून घेतल्यानंतरही भाजपचे सरकार स्थिर आहे. मणिपूरमधील भाजप सरकारमधील सहयोगी असलेल्या 'नॅशनल पीपल्स पार्टी'ने (एनपीपी) सरकारला दिलेला पाठिंबा काढून घेतला आहे. या राजकीय घडामोडींमुळे राज्याच्या स्थिरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मणिपूरची लोकसंख्या सुमारे ३८ लाख आहे. त्यात मैतेई, नागा आणि कुकी सारखे समुदाय प्रमुख आहेत. मैतेई समुदाय हिंदू धर्माचे पालन करतो आणि इम्फाळ खोऱ्यात केंद्रित आहे. दुसरीकडे, कुकी आणि नागा समुदाय ख्रिश्चन धर्माचे पालन करतात आणि डोंगराळ भागात राहतात. संसाधने, जमिनीच्या वाटपावरील वादांमुळे तणाव वाढला आहे.

### मानवतेवर प्रश्नचिन्ह

● मणिपूरमध्ये सुरू असलेला हिंसाचार राज्याच्या शांतता आणि स्थैर्यालाच आव्हान देत नाही, तर मानवतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. हे संकट संपवण्यासाठी सर्व पक्षांना एकत्र काम करावे लागेल. मणिपूरला हिंसाचारातून बाहेर काढून विकास आणि सौहार्दाच्या मार्गावर आणण्याची हीच वेळ आहे.

# माओवादी नेत्याची तुरुंगातून पदवी!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**भुवनेश्वर :** कुख्यात माओवादी नेता सब्यसाची पांडा हा ओडिशातील गंजम जिल्ह्यातील बेरहामपूर सर्कल जेलमधून मास्टर ऑफ आर्टस् (एमए) शिकत आहे. पदवीनंतर तो आता पदव्युत्तर पदवी घेत आहे. तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला सब्यसाची 'ओडिशा स्टेट ओपन युनिव्हर्सिटी'मधून लोक प्रशासनात एमएचे शिक्षण घेत आहे. दोन दशकांहून अधिक काळ पोलिस आणि प्रशासनाला त्रास देणाऱ्या सब्यसाचीला आता अभ्यासात खूप रस आहे आणि तो तुरुंगात जास्त वेळ अभ्यासात घालवत आहे.



दोन वर्षांपूर्वी 'इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी'मधून बीए केलेले पांडा आता ओडिशा मुक्त विद्यापीठात दोन वर्षांच्या एमए (सार्वजनिक प्रशासन) मध्ये प्रवेशासाठी कागदपत्रे सादर केलेल्या सहा कैद्यांपैकी एक आहे. सब्यसाचीसोबत एकूण चार कैदी आणि दोन अंडर ट्रायल कैदी (यूटीपी) परीक्षेला बसतील. कारागृह प्रशासन प्रत्येकाला अभ्यासाचे साहित्य पुरवत आहे. यासोबतच कारागृहातील शिक्षकही त्याच्या अभ्यासाला हातभार लावत आहेत.

बेरहामपूर सर्कल जेलचे अधीक्षक डीएन बारिक म्हणाले, "आम्ही पत्रव्यवहार अभ्यासक्रमाद्वारे दोन वर्षांच्या एमए (पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन) कोर्समध्ये प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या पांडासह सहा कैद्यांची कागदपत्रे गोळा केली आहेत. त्यांना त्यांच्या अभ्यासात सर्वतोपरी मदत केली जाईल. शरत उर्फ सुनील या नावाने ओळखला जाणारा सब्यसाची हा ओडिशातील माओवादी पक्षाचा प्रमुख नेता होता आणि पोलिसांना तो हवा होता. त्याच्यावर पाच लाखांचे बक्षीस होते.



"मागे वळून पाहताना, आम्ही नेहमीच थोडे वेगळे आहोत, असे वाटते. आम्हाला ज्या चौकटीत त्यांनी बसवण्याचा प्रयत्न केला, त्यात आम्ही कधीच फिट झालो नाही. आम्ही वर्षानुवर्षे बदललो आहोत, परंतु नेहमी आमच्या पद्धतीने गोष्टी केल्या. — विराट कोहली

'मी जितक्यावेळा तुला केलं नाही, त्यापेक्षा अधिकवेळा तू मला पराभूत करू शकला. बाकी कोणाहीपेक्षा तू मला सर्वाधिकवेळा आव्हान दिलंस. लाल मातीच्या कोर्टवर जेव्हा पाऊल ठेवायचो, तेव्हा असं वाटायचं की तुझ्या अंगणातच पाऊल ठेवतोय.' — राफेल नदाल



## २५ हजार डॉलर पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत

# प्रज्वल व आदिल यांना विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) यांच्या वतीने २५ हजार डॉलर पुरुष आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉच्या करण सिंग या भारताच्या खेळाडूने उपांत्य फेरीत प्रवेश केला. दुहेरीत भारताच्या एसडी प्रज्वल देव व आदिल कल्याणपूर यांनी विजेतेपद संपादन केले.

एमएसएलटीए टेनिस कोर्ट या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुष गटात एकेरीत उपांत्य फेरीत पहिल्या सामन्यात दुसऱ्या मानांकित चेक प्रजासत्ताकच्या दलिबोर सेव्हर्सिना याने सातव्या मानांकित भारताच्या करण सिंगचा ६-४, ६-० असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. हा सामना १ तास २१ मिनिटे चालला. सामन्यात करण याने पहिल्या सेटमध्ये २-५ असा पिछाडीवर असताना जोरदार कमबॅक करत ४-५ अशी स्थिती निर्माण केली. पण दलिबोरने वरचढ खेळ करत सामन्यात विजय मिळवला.

दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात उझबेकिस्तानच्या अव्वल मानांकित खुमोयुन सुलतानोवने रशियाच्या पाचव्या मानांकित बोगदन बोबरोव्हचा ६-२, ६-१ असा सहज पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

दुहेरीत अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित एसडी प्रज्वल देव व आदिल कल्याणपूर या भारतीय जोडीने भारताच्या आर्यन शहा व अमेरिकेच्या आधित्य गणेशन यांचा ६-४, ४-६, १०-७ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्या जोडीला करंडक, १३९५ डॉलर, २५ गुण, तर उपविजेत्या जोडीला करंडक, ८१० डॉलर, १६ गुण अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमएसएलटीएचे मानद सचिव सुंदर अय्यर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी आयटीएफ सुपरवायझर नितीन कन्नमवार, एमएसएलटीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

## कूटझीला दंड, डिमेरिट अंकही मिळाला


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज गेराल्ड कोएत्झीवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे. त्याच्या मॅच फीमध्ये ५०% कपात करण्यात आली आहे, तर एक डिमेरिट पॉइंटदेखील देण्यात आला आहे.

२४ वर्षीय कुएत्झीने शुक्रवार, १५ नोव्हेंबर रोजी जोहान्सबर्ग येथे भारताविरुद्ध चौथ्या टी-२० सामन्यादरम्यान पंचांच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली होती. भारतीय डावाच्या १५व्या षटकात मैदानी पंचांनी त्याचा चेंडू वाईड घोषित केला.

कोएत्झीशिवाय आयसीसीने नेदरलँडचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्स आणि ओमानचा वेगवान गोलंदाज सुफयान महमूद यांनाही दंड ठोठावला आहे. या घटनेनंतर कुटझीने सामनाधिकाऱ्यांसमोर आपली चूक मान्य केली आणि शिक्षाही मान्य केली.

## लिओनेल मेस्सी १४ वर्षांनंतर पुन्हा भारतात येतोय



**नवी दिल्ली :** दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या स्वागतासाठी भारतीय चाहते पुन्हा एकदा सज्ज झाले आहेत. १४ वर्षांतर मेस्सी पुन्हा भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे, कारण अर्जेंटिनाचा फुटबॉल संघ २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण लढत खेळण्यासाठी भारतात येणार आहे. केरळ येथे हा दौरा असणार आहे आणि येथे अर्जेंटिनाचा संघ आंतरराष्ट्री मैत्रीपूर्ण लढत खेळणार आहे. केरळचे क्रीडा मंत्री व्ही अब्दुरहिमन यांनी बुधवारी ही घोषणा केली. २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण लढत खेळण्यासाठी अर्जेंटिनाचा फुटबॉल संघ केरळ येथे येणार आहे. लिओनेल मेस्सी या संघाचा सदस्य असेल असेही त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत अब्दुरहिमन म्हणाले, केरळ राज्य सरकारच्या देखरेखीखाली हा सामना होणार आहे. या अव्वल दर्जाच्या सामन्यासाठी सरकार सर्व अर्थसहाय्य पुरवणार आहे.

## सचिन तेंडुलकर, रहाणेने बजावला मतदानाचा हक्क



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकींचे मतदान आहे. सामान्य जनतेसोबतच महाराष्ट्रातील अनेक क्रिकेटपटू आणि सेलिब्रिटीही आपला मतदानाचा हक्क बजावत आहेत. ज्यामध्ये भारताचा दिग्गज खेळाडू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने कुटुंबासह मतदानाचा हक्क बाजावला आहे. मतदान कल्यानंतर 'सगळ्यांनी या आणि मतदान करा' असे आवाहन सचिनने महाराष्ट्रातील मतदारांना केले आहे. त्याचबरोबर क्रिकेटपटू अजिंक्य रहाणेने देखील मतदान केले आहे. सचिनने पत्नी अंजली तेंडूलकर व कन्या सारा तेंडूलकर यांच्यासह वांद्रे पश्चिम मतदार संघात मतदानाचा हक्क बाजावला. भारताचा ट्वेंटी-२० कर्णधार सुर्यकुमार यादवने देखील मतदानाचा अधिकार बजावला आहे.

## मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाचा पहिला विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी वाकड यांच्या वतीने आयोजित मॅव्हेरिक्स आंतर क्लब ११ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत अवनिश मोकाशी (७२ धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीसह धृव ठक्कर (३-५) याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर

मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाने मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ग्रीन संघाचा ३२ धावांनी पराभव करून पहिला विजय मिळवला. ३० वायसीए स्पार्क क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाने १९.२ षटकात सर्वबाद १६४ धावा केल्या. यात अवनिश मोकाशीने ३२ चेंडूत ११ चौकार व ३षटकारासह ७२ धावांची आक्रमक खेळी केली. त्याला सुर्यांश बाहेती ११, आरूश जाधव १३, धृव ठक्कर नाबाद १२ यांनी धावा काढून संघाला १६४ धावा उभ्या करून दिल्या.

१६४ धावांचे आव्हान मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ग्रीन संघ १३ षटकात सर्वबाद ८२ धावावर कोसळला. यात विहान वानखेडे १५, नमित अग्रवाल 15, ओजस बक्षी नाबाद १८ यांनी धावा केल्या. विजयी संघाकडून धृव ठक्कर (३-५), आरूश जाधव (२-६), सुर्यांश बाहेती (२-८) यांनी सुरेख गोलंदाजी केली.

## आरसीबी कर्णधार पदासाठी केएल नावाची चर्चा!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयपीएल२०२५ च्या मेगा लिलावाची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतसे राहुल आरसीबीमध्ये जाऊ शकतो, अशी अफवा वाढत आहे. जिथे त्याने २०१३ मध्ये त्याच्या आयपीएल कारकिर्दीला सुरुवात केली होती. एका मीडिया रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला आहे की, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने राहुलला लिलावात खरेदी करण्यासाठी आधीच ३० कोटी रुपयांचे बजेट राखून ठेवले आहे.

केएल राहुल २०१६ पर्यंत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळला आणि त्याच हंगामात आरसीबीने आयपीएलची अंतिम फेरी गाठली. २०१६ मध्ये सनरायझर्स हैदराबाद बंगळुरूविरुद्ध विजेतेपदाच्या लढतीत होते.

## मोहम्मद कैफचा मोठा खुलासा

# सौरव गांगुलीने 'या' खेळाडूसाठी पॉन्टिंगशी घातला होता वाद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली त्याच्या आक्रमक शैलीसाठी ओळखला जातो. टीम इंडियाचा कर्णधार असतानाही त्याने प्रतिभावान खेळाडूंसाठी निवडकर्त्यांशी वाद घातला होता. आता निवृत्तीनंतर ही जेव्हा तो आयपीएलमध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाचा संचालक होता, तेव्हा त्यानी तेच केले. सौरव गांगुलीने दिल्लीचे माजी प्रशिक्षक रिकी पॉन्टिंगशी शिखर धवनसाठी वाद घातला होता. याबाबत भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने खुलासा केला. यासह कैफने दिल्ली कॅपिटल्सच्या ड्रेसिंग रूममधील अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत.

मोहम्मद कैफने सांगितले की, रिकी पॉन्टिंग दिल्लीचा मुख्य प्रशिक्षक असताना, तो ऑस्ट्रेलियन खेळाडूंना महत्त्व देत होता. त्यामुळे सौरव गांगुलीही त्याच्या विरोधात गेला होता. कैफने सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. ज्यामध्ये दिल्ली कॅपिटल्समध्ये भारतीय खेळाडूंना महत्त्व दिल्याबद्दल, कैफने गांगुलीचे कौतुक केले आहे. कैफने सांगितले की, २०१९ च्या हंगामापूर्वी पॉन्टिंगला सनरायझर्स हैदराबादकडून डेव्हिड वॉर्नरला ट्रेड करायचे होते, परंतु गांगुलीने धवनचे नाव घेतले होते. याबाबतीत गांगुली पॉन्टिंगच्या विरोधात उभा राहिला आणि यशस्वी झाला.

मोहम्मद कैफ म्हणाला, "मला वाटते की आम्ही बनवलेल्या संघासोबत तो चांगली कामगिरी करू शकला असता, हे पॉन्टिंगलाही मान्य असेल. तुमचा विश्वास बसणार नाही की एक वेळ अशी होती, जेव्हा आम्ही कोणाला प्लेइंग इलेव्हन वगळायचे याचा विचार करायचो.


## भारतीय संघाची पाचव्यांदा फायनलमध्ये धडक



**नवी दिल्ली :** गतविजेत्या भारतीय महिला हॉकी संघाने मंगळवारी जपान महिला संघावर २-० असा विजय साकारत आशियाई चॅम्पियन्स हॉकी करंडकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. भारतीय महिला संघाने सलग दुसऱ्यांदा आणि एकूण पाचव्यांदा या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. नवनीत कौर (४८वे मिनिट) व लालरेमसियामी (५६वे मिनिट) यांनी केलेले गोल भारताच्या उपांत्य फेरीतील विजयाचे वैशिष्ट्य ठरले. जपानविरुद्धच्या उपांत्य झुंजीत भारतीय महिला संघाने आश्वासक सुरुवात केली. नवनीत कौर व संगीताकुमारी यांनी गोल करण्याचा प्रयत्न केला, पण दोघींनी मारलेल्या फटक्यांवर जपानच्या गोलरक्षकाकडून बचाव करण्यात आला. पहिले क्वार्टर संपायला चार मिनिटे बाकी असताना भारतीय महिला संघाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण दीपिकाला यावर गोल करता आला नाही.

## आदिश्री, आलोक इलेव्हन उपांत्य फेरीत; निलेश भिंताडे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** आदिश्री इंटरप्राइजेस, आलोक इलेव्हन या संघांनी निलेश भिंताडे स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने आयोजित पुणे जिल्हा टेनिस प्रीमियर एन. बी. ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

वडगाव बुद्रुक येथील सिंहगड रोडवरील मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत आदिश्री संघाने मातोश्री इलेव्हन संघावर तीन गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मातोश्री इलेव्हन संघाने निर्धारित ८ षटकांत ५ बाद ८७ धावा केल्या. यात दिलीप वर्माने २१ चेंडूंत चार षटकार व तीन चौकारांसाह ५१ धावा केल्या. मात्र, त्याला दुसऱ्या बाजूने अपेक्षित साथ मिळाली नाही. आदिश्रीने विजयी लक्ष्य सात गडी गमावून ७.३ षटकांत पूर्ण केले. आदिश्री संघाची सुरुवात निराशाजनक झाली होती. त्यांचा निम्मा संघ ४ षटकांत २८ धावांत माघारी परतला होता. आकाश काळेने १२ चेंडूंत दोन चौकार व दोन षटकारांसह नाबाद २६, तर विजय खडकेने चार चेंडूंत दोन षटकारांसह नाबाद १५ धावा करून संघाला विजय मिळवून दिला.

दुसऱ्या लढतीत कर्णधार राहुल सातवच्या आक्रमक अर्धशतकानंतर गोलंदाजांनी केलेल्या अचूक माऱ्याच्या जोरावर अलोक इलेव्हन संघाने प्रहार संघावर ६० धावांनी विजय मिळवला. आलोक इलेव्हन संघाने प्रथम फलंदाजी करताना २ बाद ११५ धावांपर्यंत मजल मारली. यात राहुलने २३ चेंडूंत पाच षटकार व तीन चौकारांसह नाबाद ५६ धावांची खेळी केली.

## पाकिस्तानात क्रिकेटपटूंच्या हॉटेलला भीषण आग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** टीम हॉटेलमध्ये आग लागल्याने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला कराचीमध्ये सुरू असलेली राष्ट्रीय महिला एकदिवसीय स्पर्धा अचानक थांबवावी लागली आहे. ज्यामध्ये पाच खेळाडू थोडक्यात बचावले आहेत. या आगीनंतर पाकिस्तानात खळबळ प्रचंड उडाली आहे. पीसीबीने पाच प्रतिस्पर्धी संघ आणि संघाच्या अधिकाऱ्यांसाठी संपूर्ण मजला बुक केला होता. आग लागली तेव्हा बहुतांश खेळाडू हॉटेलबाहेर होते. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र यामुळे पाकिस्तानच्या व्यवस्थेवर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत.

पीसीबीच्या एका सूत्राने सांगितले की, आग लागली तेव्हा पाच खेळाडू वगळता सर्व क्रिकेटपटू आणि अधिकारी सामन्यात किंवा नेट सेशनसाठी नॅशनल स्टेडियमवर होते.

## गिलचा खेळण्याचा निर्णय सामन्यापूर्वी : मोर्केल

**नवी दिल्ली :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना २२ नोव्हेंबरला पर्थमध्ये खेळवला जाणार आहे. टीम इंडियाचे गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्नी मोर्केल यांनी गिलच्या दुखापतीबाबत अपडेट दिले आहे. पर्थ येथील पत्रकार परिषदेत ते म्हणाले, गिल दिवसेंदिवस बरा होत आहे. शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर मालिकेतील पहिल्या सामन्यात गिलच्या खेळण्याबाबतचा निर्णय सामन्यापूर्वी घेतला जाणार आहे. सामन्याच्या तयारीदरम्यान त्याने चांगली कामगिरी केली. त्यामुळे तो यशस्वी होईल अशी आशा आहे.

## हार्दिक पांड्या आयसीसी अष्टपैलू रँकिंगमध्ये पहिल्या क्रमांकावर पोहोचला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या आयसीसीच्या ताज्या जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा अष्टपैलू खेळाडू बनला आहे. त्याने इंग्लंडच्या लियाम लिव्हिंगस्टनला मागे टाकले आहे. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत सलग दोन शतके झळकावणाऱ्या तिलक वर्माने फलंदाजांच्या क्रमवारीत ६९ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. आता ते तिसऱ्या क्रमांकावर पोहोचले आहेत.

ऑफस्पिनर वरुण चक्रवर्तीला ३६ स्थानांचा आणि सलामीवीर संजू सॅमसनला १७ स्थानांचा फायदा झाला आहे. वरुण गोलंदाजी क्रमवारीत २८ व्या तर संजू फलंदाजीच्या क्रमवारीत २२ व्या स्थानावर पोहोचला आहे. तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव आणि यशस्वी जैस्वाल हे ३ भारतीय टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-१० मध्ये आहेत. तर गोलंदाजी क्रमवारीत अर्शदीप सिंग आणि रवी बिश्नोई हे दोन भारतीय टॉप-१० मध्ये आहेत. अष्टपैलू हार्दिक पंड्याने अलीकडेच दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात ३९ धावांची नाबाद खेळी खेळली. तर चौथ्या टी-२० सामन्यात त्याने 8 धावांत १ बळी घेतला. त्यामुळे तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नंबर १ अष्टपैलू खेळाडू बनला.

## ऑस्ट्रेलियाच्या 'डाव्यां'साठी हुकूमी एक्क्याची एन्ट्री

# पर्थची खेळपट्टी पाहून भारताने रणनीती बदलली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** बॉर्डर गावस्कर ट्रॉफीसाठी भारत-ऑस्ट्रेलिया हे दोन तगडे संघ शुक्रवारपासून मैदानावर उतरतील. पर्थच्या मैदानावर होणाऱ्या या सामन्यात खेळपट्टी ही यजमान ऑस्ट्रेलियाच्या जलदगती गोलंदाजांसाठी पोषक दिसत आहे. खेळपट्टीवर हलकं गवत असल्याने ऑसींकडून बाऊन्सर, इन स्विंग-आऊट स्विंगचा मारा पाहायला मिळणार, हे निश्चित आले. भारतीय फलंदाज वेगवान माऱ्यासमोर चाचपडताना दिसले आहेत.

त्यामुळे जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज या भारतीय वेगवान गोलंदाजांकडून तशाच कामगिरीची अपेक्षा आहे. पर्थ कसोटीसाठी भारतीय संघ यजमानांच्या 'डाव्यां'ना रोखण्यासाठी मोठी चाल चालणार आहे.

भारतीय संघ कोणत्या प्लेइंग इलेव्हनसह पहिल्या कसोटीत मैदानावर उतरणार, याची उत्सुकता आहे. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत जसप्रीत पहिल्या कसोटीत नेतृत्व करणार आहे. शुभमन गिलला दुखापतीमुळे पहिल्या कसोटीला मुकावे लागले आहे. त्यामुळे लोकेश राहुल व यशस्वी जैस्वाल ही जोडी सलामीला येईल. मधल्या फळीत गिलच्या जागी देवदत्त पडिक्कल खेळणार हेही ठरले आहे.

विराट कोहली चौथ्या, ऋषभ पंत पाचव्या आणि ध्रुव जुरेल सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला येतील, असा अंदाज आहे. पण, गोलंदाजीचे कॉम्बिनेशन कसे असेल, याची उत्सुकता आहे. जसप्रीतच्या मदतीला अनुभवी शिलेदार सध्यातरी संघात दिसत नाहीए. त्यात भारतीय संघ व्यवस्थापन आर अश्विन या एकमेव फिरकीपटूसह खेळण्याचे वृत्त समोर येत आहे. ऑस्ट्रेलिया तीन डावखुऱ्या फलंदाजांसह खेळणार असल्याचा अंदाज आहे आणि त्यांना रोखण्यासाठी भारतीय संघ आर अश्विनला खेळवण्याच्या तयारीत आहे.